**बिसेन डेन्टल केअर**

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)



दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक २२ | बुधवार, दि.०८ मे २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


## नक्षल्यांचा घातपाताचा कट फसला

### स्फोटकांनी भरलेली ६ प्रेशर कुकर्स, डेटोनेटर्स, माईन्स पोलिसांकडून नष्ट



**गडचिरोली:–** लोकसभा निवडणुकीदरम्यान नक्षल्यांनी टिपागड पहाडावर दडवून ठेवलेली शक्तीशाली स्फोटके पोलिसांनी (सोमवार) सकाळी हुडकून काढली. यामुळे मोठ्या प्रमाणावर पोलिसांचा घातपात करण्याचा नक्षल्यांचा कट फसला.

पहिल्या टप्प्यात १९ एप्रिलला गडचिरोली–चिमूर लोकसभा क्षेत्राची निवडणूक झाली. या निवडणुकीदरम्यान नक्षल्यांनी टिपागड परिसरात स्फ ोटके दडवून ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. परंतु त्यावेळी ही स्फोटके पोलिसांना सापडली नाहीत. शिवाय मोठ्या प्रमाणावर पोलिस बंदोबस्त असल्यामुळे नक्षल्यांनाही घा–तपात करता आला नाही. परंतु स्फोटके असल्याची खात्रीशिर माहिती मिळाल्यानंतर सी–६० पोलिस आणि केंद्रीय राखीव दलाचे जलद प्रतिसाद पथक तसेच बॉम्ब शोधक व नाशक विभागाचे दोन पथक टिपागड परिसरात पाठविण्यात आले.

या पथकातील जवानांनी पहाडावर दडवून ठेवलेली स्फ ोटके, क्लेमोर माईन्स आणि प्रेशर कुकर्स हुडकून काढण्यात आले. पोलिसांना घटनास्थळी स्फोटकांनी भरलेली ६ प्रेशर कुकर्स, डेटोनेटर्स, स्फ्फोटके असलेली ३ क्लेमोर माईन्स आणि ३ रिकामी क्लेमोर माईन्स आढळून आली. शिवाय गन पावडर, ब्लँकेट आणि औषधेही तेथे सापडली. त्यानंतर बॉम्ब शोधक व नाशक पथकाच्या पोलिसांनी ही स्फोटके आणि क्लेमोर माईन्स नष्ट केली, अशी माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली. पोलिस जवळच्या पोलिस ठाण्यात सुखरुप पोहचल्यानंतर तेथे नक्षल्यांवर गुन्हा दाखल करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

## अधिपरिचारिका पदभरतीत मागासवर्गीय प्रवर्गांना डच्चू

### वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे षडयंत्र;राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचा आरोप

**गोंदिया** : स्टाफ नर्स अर्थात अधिपरिचारिका पदभरतीत मागासवर्गीय प्रवर्गांना डावलण्यात आले असून, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे (डीएमईआर) हे षडयंत्र असल्याचा आरोप राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाने केला आहे.



वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फ्रत शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद तसेच म ानसिक आरोग्य केंद्र विभागाअंतर्गत गट मकफ अधिपरिचारिका (४१२३ पदे) या पदासाठी सरळसेवा भरती प्रक्रिया १० मे २०२३ रोजी आयोजित केली होती. या भरतीस एक वर्ष पूर्ण होऊनही अद्याप समांतर आर–क्षणातील रिक्त जागांनुसार प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाले नाहीत. त्यामुळे प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. या प्रकरणावरून वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचा भोंगळ कारभारही समोर आला आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या २५ जानेवारी २०२४ च्या शासन निर्णयाचे काटेकोरपणे पालन न झाल्याचेही निदर्शनास आले आहे.

**राखीव प्रवर्गावर अन्याय...**

अधिपरिचारिका या पदाकरिता खुल्या प्रवर्गाच्या समांतर आर–क्षणामधील खेळाडूंच्या १८ रिक्त जागा भरताना शासन निर्णयानुसार प्रतीक्षा यादीतील गुणवत्तेनुसार इतर पात्र उमेदवारांमधून भरले गेले पाहिजे होते. परंतु, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने तसे न करता केवळ खुल्या प्रवर्गाच्या असलेल्या उमेदवारांनाच नियुक्ती आदेश वाटप केल्याचे

निदर्शनास आले आहे. यावरून राखीव प्रवर्गावर अन्याय झाल्याचे दिसून आले आहे. तसेच कोणतीही निवड यादी प्रसिद्ध न करता नियुक्ती आदेश परस्पर ई–मेलद्वारे वाटप केल्याचे समोर आले आहे.

याबाबत राखीव प्रवर्गाच्या उमेदवारांमध्ये तीव्र नाराजी असल्याचेही राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाने निवेदनात नमूद केले आहे.

**एनओसीत अडकली ६०० पदे**

दुसऱ्या निवड यादीत समांतर आरक्षणाची काही पदे भरण्यात आली; पण माजी सैनिकाची ६०० पदे भरण्यात आली नाही. कारण सैनिक कल्याण बोर्ड पुणेकडून एनओसी मिळाली नाही. माजी सैनिक कल्याण विभाग पुणे येथील आयुक्तांद्वारा योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता न केल्याने माजी सैनिक कल्याण विभागाच्या जागा समांतर आर–क्षणात रूपांतरित होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे रुग्णसेवा बाधित झाली आहे.

## ...मृत्यूनंतरही १४ जणांना मिळाले फिटनेस प्रमाणपत्र

### शल्य चिकित्सक कार्यालयाचा असाही प्रताप ;शासनाच्या विविध योजनांसाठी फिटनेस प्रमाणपत्रांची खैरात

**गोंदिया:** शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी फिटनेस प्रमाणपत्रांची गरज असते. त्यासाठी लाभार्थी किंमत मोजून प्रमाणपत्र मिळवितात. मात्र चक्क २०२१ मध्ये मृत्यू झालेल्यांना २०२४ मध्ये फिटनेस प्रमाणपत्रांची खैरात वाटून शासकीय पदाचा दुरुपयोग केल्याची गंभीर बाब येथील जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयात समोर आली आहे. या प्रकाराची तक्रार उच्च न्यायालयासह राज्याचे मंत्री, अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांकडेही करण्यात आली आहे. मृत्यूनंतरही ते १४ जण अद्याप जिवंतच दाखविल्याने नागरिकांनाही धक्काच बसला आहे.




जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत. मात्र केवळ कागदोपत्री प्रसिद्धी करुन आपण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करीत असल्याचा दिखावा करण्यात येत आहे. जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयासंदर्भात न बोललेलेच बरे. कोव्हिड काळात झालेला घोळ, दिव्यांग प्रमाणपत्र वाटपात करण्यात येण–ारी हेराफेरी हे विषय खूप गाजले. आता तर चक्क या कार्यालयाने मृत व्यक्तींनाच फिटनेस प्रमाणपत्र देऊन नवीन इतिहासच रचला आहे. यासंदर्भात उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठ, महाराष्ट्राचे लोकायुक्त, मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री, जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आलेल्या तक्रारीनुसार जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबरिश मोहबे यांनी पैसे घेऊन कसलीही सहनिशा न करता २०२१,२०२२,२०२३ मध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या नावाने २०२४ मध्ये फिटनेस प्रमाणपत्र दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. जानेवारीपासून एप्रिल महिन्यापर्यंत तब्बल १४ मृत व्यक्तींच्या नावे फिटनेस प्रमाणपत्र देण्यात आल्याचा आर–ोप करण्यात आला आहे. ज्या मृत व्यक्तींच्या नावे फिटनेस प्रमाणपत्र देण्यात आले, त्यात मृत व्यक्तीला फिट दाखवून त्यांच्य विम्याचे पैसे मिळवायचे होते, अशी माहिती आहे. जिल्हा शल्यचिकित्सक आधीपासूनच वादग्रस्त राहिले असताना आता हा नवा घोळ समोर आल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होते की केवळ सोपस्कार आटोपण्यात येते? याकडे नागरिकांचे लक्ष ला–गले आहे.

**माझ्यावर केलेले आरोप चुकीचे आहेत. ज्यांना माझ्याशी वैयक्तिक समस्या असेल तेच व्यक्ती आरोप करीत आहेत. कारवाईच्या भितीने काही कर्मचारीच अशी माहिती पसरवित असावेत. तक्रारकर्त्यांनी माझ्याशी भेटून काय ती समस्या मांडावी.**

**अंबरिश मोहबे, जिल्हा शल्यचिकित्सक, गोंदिया**

## राखीव क्षेत्रातून तेंदूपत्ता संकलन;जंगले धोक्यात

**गोंदिया** : ठरवून दिलेले सर्वसाधारण क्षेत्र वगळता राखीव क्षेत्रात शिरून तेंदूपत्ता संकलनाचे काम जोमात सुरू आहे. या प्रकाराला संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचेही पाठबळ असल्याचे बोलले जाते. त्यामुळे जंगले व वन्यप्राण्यांचे अस्तीत्व धोक्यात आले आहे.

दरवर्षी तेंदूपत्ता संकलनातून कोट्यवधी रुपयांचे व्यवहार होतात, टेंडर काढले जातात, त्यानुसार मजूर रोज पहाटे किंवा सकाळी जंगलात जातात, तेंदूपत्ता गोळा करतात आणि तेंदू युनिटमध्ये विकतात. शंभर पुड्यांवर २८५ ते ३०० रुपये मि ळतात. तथापि, सर्वात मोठा रोजगार देणारा हंगाम असल्याने मजुरांना मोठा दिलासा मि ळाला आहे. परंतु, ठराविक सर्वसाधारण क्षेत्र वगळता राखीव क्षेत्रातून तेंदूपत्ता संकलन केले जात आहे. हा प्रकार नवेगाव–नागझिरा अभयारण्याअंतर्गत येणाऱ्या मंगेझरी, कोडेबर्रा, बोदलकसा व परिसरात सर्रास सुरू आहे. मजूर मोठ्या संख्येने राखीव क्षेत्रात शिरून तेंदूपत्ता संकलन करीत आ–हेत. जंगलात वाघ, बिबट, अस्वल, रानगवा अशा हिंस्त्रपशुंचा अधिक वावर आहे. त्यामुळे मजुरांसह या वन्यजीवांनाही धोका आहे. वन्यप्राणी–मनुष्य असा आधीपासून असलेला संघर्ष पुन्हा चव्हाट्यावर येण्याची शक्यता आहे. मागील वर्षी अशीच एक घटना घडली होती. त्यात एका महिलेचा वाघाने जीव घेतला होता.

वन्यप्राण्यांचे हल्ले या हंगामात हमखास होत असले तरी, टेंडर घेणारे संबंधित अधिकाऱ्यांच्या संगणमताने मजुरांना खुली सुट देत आहेत. हे मजूर राखीव क्षेत्रात शिरून तेंदूपत्ता संकलन करत आहेत. मग वन्यप्राण्याने हल्ला केल्यास, जीव गेल्यास कोण जबाबदार राहणार हा खरा प्रश्न आहे. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी तिरोडा वनविभागाअंतर्गत येणाऱ्या राखीव क्षेत्रात तेंदूपत्ता संकलन करणाऱ्या काही मजुरांना वनविभागाने पकडले होते. परंतु, टेंडर घेणाऱ्याच्या दबावापोटी अधिकाऱ्यांनी कारवाई न करता त्यांना अभय दिले. यात

मजुरांचा दोष नाही. मात्र, त्यांना राखीव जंगलात तेंदूपत्ता संकलन करण्यासाठी पाठविणाऱ्यांवर कारवाई होणे अपेक्षित आहे. परंतु, अधिकाऱ्यांचे पाठबळ असल्यामुळे कारवाई टाळली जात असून, राखीव क्षेत्रात तेंदूपत्ता संकलन करण्यास खुली सुट दिली जात आहे.

**वन्यजीवांसह मजुरांच्याही जीवाला धोका**

राखीव क्षेत्रात मजूर तेंदूपत्ता संकलन करीत आहेत. त्यामुळे या क्षेत्रात वावर असलेल्या वन्यजीवांपासून मजुरांच्या जी–वाला अधिक धोका आहे. सोबतच जंगले विरळ होत असल्याने वन्यजीव गावाकडे मोर्चा वळवित आहेत. त्यामुळे वन्यजीवांची शिकारही होण्याची शक्यता अधिक आहे.

सर्वसाधारण क्षेत्रातच तेंदूपत्ता संकलन करावे, अशा सूचना मजुरांना दिल्या आ–हेत. मात्र, ते राखीव क्षेत्रात शिरून तेंदूपत्ता संकलन करतात, हे खरे आहे. पुढे असे होऊ नये, याकरिता सक्त ताकीद दिली जाईल.**राघवेंद्र मून, आरएफओ, तिरोडा.**

## उड्डाणपुलाच्या मुद्यावर आता काँग्रेसही झाली आक्रमक



**गोंदिया:** शहरातील गोंदिया–बालाघाट मार्गावरील रेल्वे उड्डाणपुलाचे काम गेल्या वर्षभरापासून ठप्प पडले आहे. परिणामी शहरवासीयांना याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत असून वाहतुककोंडीत वाढ झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि कंत्राटदाराच्या मनमर्जी कारभारामुळे उड्डाणपुलाचे बांधकाम रखडल्याचा आरोप करीत पुलाचे बांधकाम त्वरित सुरु न केल्यास रस्त्यावर उतरण्याचा इशारा जिल्हा काँग्रेस कमिटीने सोमवारी (दि.६) सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता लभाने यांना निवेदनातून दिला आहे.

शहरातील गोंदिया–बालाघाट मार्गावरील रखडलेल्या उड्डाणपुलाच्या प्रश्नाला घेऊन जिल्हा काँग्रेस कमिटीने जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड यांच्या नेतृत्वात सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी लभाने यांची भेट घेतली. यावेळी उड्डाणपुलाच्या बांधकामाला होत असलेल्या विलंबाबाबत संताप व्यक्त केला.यावर कार्यकारी अभियंत्यांनी गुरुवारपासून पुलाच्या बांधकामाला सुरुवात करण्याचे आश्वासन दिले. गुरुवारपासून काम सुरु न झाल्यास या विरोधात रस्त्यावर उतरण्याचा इशारा काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड, महासचिव अमर वऱ्हाडे, शहराध्यक्ष योगेश अग्रवाल, महिला काँग्रेस जिल्हाध्यक्ष वंदना काळे,निलम हलमारे,राजू काळे, आकाश उके,स्नेहा कोल्हे,देवेंद्र दमाहे, राजकुमार पटले, राजकुमार बागडे, मंथन नंदेश्वर, अमर तिघाला, विष्णू नागरीकर,आदींचा समावेश होता.

## आंबेनाला प्रकल्पाकरीता आ.रहांगडालेंची दिल्लीत चर्चा



**तिरोडा तालुक्यातील निमगाव आंबेनाला प्रकल्पाच्या कामाला तातडीने सुरु करण्याची परवानगी देण्यात यावे,याकरीता आमदार विजय रहांगडाले यांनी दिल्ली येथे सुनीत भारद्वाज सहाय्यक वन महानिरीक्षक पर्यावरण,वन,मंत्रालय यांची भेट घेत.चर्चा केली.**



**१ मे २०२४ रोजी गोंदिया जिल्हा निर्मितीला २५ वर्ष पुर्ण झाल्याने रौप्य महोत्सव विशेषांकाचे प्रकाशन बेरार टाईम्सच्या वतीने करण्यात आले.या विशेषकांचे प्रकाशन राज्याचे अन्न औषध व प्रशासन मंत्री तसेच गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धर्मरावबाबा आत्राम यांच्या हस्ते,भंडारा–गोंदिया विधानपरिषदेचे माजी आमदार व जिल्हा बँकेचे अध्यक्ष राजेंद्र जैन,शहर राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष नानू मुदलीयार,संपादक खेमेंद्र कटरे यांच्या हस्ते हॉटेल जिंजर येथे छोटेखानी कार्यक्रमात करण्यात आले.**

## वर्षभरातच जंगलातील बंधारे बेपत्ता; वन्यजीवांची तहान भागेना!

**गोंदिया:–** वनांच्या प्रमाणात घट आणि पर्यावरणाचा अमतोल वाढत आहे. यामुळे वन्यजीवांचा अधिवासाचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. यावर उपाययोजना म्हणून शासनाकडून कोट्यवधीचा निधी खर्च केला जात आहे. परंतु, अधिकाऱ्यांच्या नियोजनशुन्य कारभारामुळे शासनाच्या निधीचा चुराडा होत आहे. असा प्रकार चिचगड वनपरिक्षेत्रात दिसून येत आहे. वन्यप्राण्यांची तहान भागविण्यासाठी बांधण्यात आलेले बंधारे वर्षभरात गायब झाले आहेत. यामुळे वन्यजीवांची तहान कशी भागणार? असा प्रश्न वन्यप्रेमींनी उपस्थित केला आहे.



**वन्यजीवांची तहान भागेना, निधीचा चुराडा**

वनांचे घटते प्रमाण आणि पर्यावरणाचा ऱ्हास वन्यजीवांच्या म ुळावर उठला आहे. जंगलात चारा, पाणी मिळत नसल्याने वन्यजीव गावाकडे धाव घेतात. यातून मानव–प्राणी संघर्षाच्या अनेक घटना घडत आहेत. तर गावाच्या दिशेने धाव घेणाऱ्या मुक्या जीवांना प्राणासही मुकावे लागत आहे. या प्रकाराने जंगलातील वन्यजीवांचा अधिवास धोक्यात आले आहे. अनेक वन्यजीवांच्या प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाच्या वतीने जंगलातच वन्यप्राण्यांसाठी पाण्याची सोय व्हावी, पर्यावरणाचा समतोल राखला जावा, भु–गर्भातील पाणीसाठ्यात वाढ व्हावी, या उद्दे–शाने कोट्यावधीचे रूपये खर्च केला जातो. पण अधिकाऱ्यांच्या नियोजन शून्यतेमुळे शासनाचा पैसा वाया जात असल्याचे चित्र दिसत आहे.

**अधिकारी–कंत्राटदाराची मिलीभगत**

चिचगड वनपरिक्षेत्रातील पिपरखारी गावाजवळ दोन तर घोगरा गावा जवळील नाल्यावर प्रत्येकी अंदाजे दहा लाख रुपये खर्च करून सन २०२३ मध्ये बंधारे बांधण्यात आले आहेत. लाखो रूपये खर्च करून तयार करण्यात आलेले जंगलात बांधण्यात आलेले बंधारे अंत्यत निकृष्ट दर्जाचे असून थेंबभर पाणी साचून राहत नाही. त्यामुळे या बंधाऱ्याचा उपयोग काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. बंधाऱ्याचे बांधकाम निकृष्ट व नियोजन शुन्यतेमुळे तिन्ही बंधारे ठिकठिकाणी फुटून भेगा गेल्याने त्या बंधाऱ्याजवळ एक थेंबही पाणी साचून राहत नाही. त्यामुळे बंधारा बांधकामातून मलई लाटण्यातच कंत्राटदार व अधिकाऱ्यांनी धन्यता मानली असावी? अशीही चर्चा वन्यप्रेमीम ध्ये सुरू झाली आहे.

**बंधाऱ्यांचा दर्जा, गुणवत्ता तप–ासणार कोण?**

महाराष्ट्र शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून कॅम्प योजनेअंतर्गत बंधाऱ्यांची निर्मिती २०२३ मध्ये करण्यात आली आहे. यातंर्गत पिपरखारी गावाजवळ दोन व घोगरा गावाजवळील नाल्यावर एका बंधारा बांधण्यात आला. वर्षभरातच बंधारे वाहून गेले? त्याम ुळे कामाचा दर्जा आणि गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तिन्ही बंधारे बांधत असताना मालस–ुतो अभियान राबवून अधिकारी व कंत्राटदाराने कामाचा दर्जा व गुणवत्ता गहाण ठेवल्याची चर्चा जोमात सुरू आहे.

**चौकशी करून कारवाई करा**

वनविभागाच्या वतीने वन्यजीवांची भटकंती टाळून जंगलात सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कोट्यवधीचा चुराडा केला जात आहे. पण अधिकारी कंत्राटदारांना हाताशी धरून शासन निधीची पुरती वाट लावत आहेत. असाच प्रकार वनविभागातंर्गत येणाऱ्या विविध कामांच्या गुणवत्तेवरून दिसून येत आहे. त्यामुळे विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निष्पक्ष कामाची चौकशी करून भ्रष्टचाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

## २५ वर्षात महामार्गाचे जाळे विणले गेले,पण उद्योगाची वाणवा

**गोंदिया:–** जिल्हा निर्मितीला उद्या २५ वर्षे होत असताना ही गोंदियासारख्या दुर्गम,जंगलव्याप्त,नक्षलप्रभावित जिल्ह्यात अजूनही अनेक कार्यालये पुर्ण शक्तीने कार्यान्वीत झालेली नाहीत. त्यामध्ये राज्य परिवहन विभागाचे विभागीय कार्यालय, प्रदुर्षण मंडळाचे कार्यालय असो कि जिल्ह्यातील विमानतळावरुन प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरु होऊनही पासपोर्ट कार्यलय हे अद्यापही सुरु होऊ शकलेले नाहीत. निसर्ग सौंदर्याने नटलेला जिल्हा हळूहळू एनएनटीआर व्याघ्रप्रकल्पामुळे चर्चेत येऊ लागला असला तरी २५ वर्षाच्या काळात पाहिजे तसे पर्यटन विकास जिल्ह्याचे झाले नाही. त्यासोबतच धानउत्पादक जिल्हा असलेल्या या जिल्ह्यात राईस मिलचा मोठा व्यवसाय असला तरी या उद्योगाशिवाय दुसरा उद्य–ोग न आल्याने रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. पर्यटन व्यवसायाकरीता चांगली संधी असताना सकारात्मक विच–ाराचे अधिकारी न मिळाल्यानेही जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणूनही नावारुपास २५ वर्षाच्या कार्यकाळात येऊ शकला नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे.




राज्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त भाग असलेल्या जिल्ह्यातील विकासाच्या योजना राबविण्याकरीता महत्वाच्या असलेल्या पदांच्या नियुक्त्या प्राधान्य त्या भागात करण्यात यावे. त्या ठिकाणच्या जागा रिक्त राहू नये असे शासनाचे धोरण असतानाही मात्र आदिवासी व नक्षलग्रस्त भागाच्या यादीत असलेल्या गोंदिया जिल्ह्यात आजही महत्वाच्या अधिकायाची पदे रिक्त असल्याचे चित्र आहे. म हत्वाच्या वर्ग १ मध्ये येणार्या विविध विभागातील पदे रिक्त असल्यने प्रशासकीय कामाचा ताण निर्माण झालेला आहे. मात्र या जिल्ह्यातील रिक्त पदांना भरण्यासाठी कुठल्याही पालकमंत्र्यासह जिल्ह्यातील एकाही खासदार आमदाराने प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही.

विशेष म्हणजे आदिवासी क्षेत्रातील बिकट परिस्थितीत शासनाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या त्या भागात काम करताना येणाऱ्या विविध अडचणींचा विचार करुन तसेच नक्षलग्रस्त/संवेदनशील भागात (जिवीताची) सुरक्षितता आदी बाबी लक्षात घेवून त्यांना काही प्रोत्साहनपर सवल–तीही देण्यात आलेल्या आहेत.

त्यानंतरही आदिवासी व नक्षलग्रस्त गोंदिया जिल्ह्यात अनेक पदे रिक्त पडली आ–हेत. तर ग्रामविकासाचा गाळा हाकणाऱ्या जिल्हा परिषदेत अनेक कर्मचारी संवर्गाची पदे व सहाय्यक गटविकास अधिकारी यांचीही पदे रिक्त असल्याने पाहिजे त्याप्रमाणात विकासाचे रथ पुढे गेले नाही.जिल्ह्याच्या निर्मितीनंतर आजही गोंदिया जिल्ह्यातील अनेक पंचायत समिती कार्यालयाचे कामकाज हे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीमधून चालत असून त्या प्रशासकीय इम ारतीच्या पुर्नबांधणीकडे लक्ष दिले गेल्याचे दिसून येत नाही. राष्ट्रीय महामार्गाच्या विस्तारीकरणाने जिल्ह्याच्या दळणवळणाचा मार्ग जरी मोकळा झालेला असला तरी या २५ वर्षात अदानीचा विज प्रकल्प वगळता दुसरा उद्योग या जिल्ह्यात येऊ शकला नाही.

तर जिल्हा नक्षलग्रस्त असतांनाही याठिकाणी कारागृहाचे बांधकाम मात्र अद्यापही सुरु होऊ न शकल्याने येथील आरोपींना दूर अंतरावरील भंडारा येथील कारागृहात न्यावे लागते. त्यामुळे शासनाच्या पैशाचा आणि वेळेच–ाही अपव्यय होतो. दशकभरार्षापुर्वी जिल्हा कारागृह बांधकामाच्या हालचाली सुरू ही झाल्या,मात्र म ाशी कुठे शिंकली कुणास ठाऊक! तेव्हापासून कारागृह निर्मितीच्या हालचाली थंडबस्त्यात आहेत.जेव्हा गोंदिया कारागृहाकरीता पोलीस म ुख्यालय शेजारी असलेल्या कारंजा परिसरात जागेची पाहणी आधीच करण्यात आलेली आहे.

३०० कैद्यांची क्षमता अस–लेले कारागृह निर्माण होणार होते. मात्र,जिल्ह्याला २५ वर्ष लोटूनही कारागृह मिळू शकले नाही. यासाठी तत्कालीन शासन, प्रशासन व लोकप्रतिनिंधींचे प्रयत्न कमी पडले असावे, असेच म्हणावे लागेल.

## संपादकीय

### नियोजनबद्ध कचरा व्यवस्थापन

कचरा किंवा कचरा व्यवस्थापन ही देशातील मोठी समस्या आहे. दिल्ली, मुंबईसारख्या महानगरांनाही या समस्येने ग्रासले आहे. दिल्लीच्या बाहेरील भागात अनेक ठिकाणी कचऱ्याचे डोंगर पाहायला मिळतात; पण ही समस्या सोडवता येणार नाही असे नाही. आता कचरा व्यवस्थापन हा मोठा व्यवसाय झाला आहे. सिंगापूर आणि इंदूरसारख्या काही शहरांमध्ये नियोजनबद्ध पद्धतीने कचऱ्याचे व्यवस्थापन केले जाते. त्यातून काय शिकता येईल?

जगातील अनेक शहरांप्रमाणेच सिंगापूरसारख्या देशातही कचरा व्यवस्थापनाचे आव्हान होते. देशाची वाढती लोकसंख्या आणि वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था यामुळे या बाबतीत अडचणी निर्माण झाल्या होत्या. २०१६ मध्ये एकाच दिवसात विक्रमी ८,५५९ टन कचरा जमा झाला होता. २०१९ मध्ये ७२ लाख टनांपेक्षा जास्त घनकचरा निर्माण झाला. यातील २९.५ लाख टन कचऱ्याचा पुनर्वापर होऊ शकला नाही. या कचऱ्याचे काळजीपूर्वक आणि कार्यक्षमतेने व्यवस्थापन करणे आवश्यक होते. त्यावर सिंगापूरने ही समस्या सोडवण्याचा सोपा मार्ग शोधला.

भारतात पुनर्वापर करण्यायोग्य ७५ टक्के कचऱ्यापैकी केवळ ३० टक्के कचऱ्याचा पुनर्वापर केला जातो. त्यामुळे कचरा व्यवस्थापन व्यवसायात वाढ होण्याची दाट शक्यता आहे.

आज अनेक उद्योजक कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि त्याचे महत्त्वपूर्ण संसाधनांमध्ये रूपांतर करण्यासाठी नवीन मार्गांचा विचार करत आहेत. वाढती घनता आणि जलद औद्योगिकीकरणामुळे मोठ्या प्रमाणात विषारी आणि गैरघातक कचरा निर्माण होतो. कचऱ्यामध्ये अनेक प्रकारच्या वस्तू असतात. यामध्ये प्लास्टिकपासून बनवलेल्या बाटल्या, प्लास्टिकपासून बनवलेल्या फिल्म्स, फोम, कडक प्लास्टिक तंतू आणि इतर गोष्टींचा समावेश आहे. काही नगरपालिका आणि महानगरपालिका सामान्य वापरासाठी लेबल केलेले कंटेनर उघड्यावर ठेवून निवासी आणि व्यावसायिक ग्राहकांना रिसायकलिंग डब्बे उपलब्ध करून पुनर्वापर सुलभ करतात. पुनर्वापराचे असंख्य फायदे आहेत आणि शक्य तितक्या गोष्टींचा पुनर्वापर करून आपण आपला ग्रह स्वच्छ करण्यात मदत करू शकतो. रिसायकलिंग केवळ पर्यावरणासाठीच नाही, तर अर्थव्यवस्थेसाठीही चांगले आहे.

भारतातील मटेरियल रिकव्हरी मार्केट दरवर्षी ६.५ टक्क्यांनी वाढत आहे आणि २०२४ पर्यंत ५३७.२ दशलक्ष डॉलरपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. भारतीय रिसायकलिंग उत्पादन उद्योग वेगाने वाढत आहे. सध्या देशात दहा कचरा पुनर्वापर व्यवस्थापन कंपन्या आहेत. त्यांच्या मुख्य सेवांमध्ये कचरा संकलन, पुनर्वापर, घातक रसायने काढून टाकणे आणि विल्हेवाट लावणे, वाहतूक, प्रक्रिया, प्लास्टिक पुनर्वापर आणि नष्ट करणे, कंटेनर भाड्याने देणे आणि सुरक्षा एजन्सी यांचा समावेश होतो. कचरा संकलन, वर्गीकरण, विल्हेवाट आणि पुनर्वापर हाताळणाऱ्या कंपन्यांकडे कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जाईल, याची खात्री करण्यासाठी सर्व आवश्यक उपकरणे आहेत. गोळा केलेला कचरा एक तर पुनर्वापर किंवा कंपोस्ट केला जातो. यामुळे कार्बन उत्सर्जन कमी करून पृथ्वी आणि पर्यावरणाचे रक्षण केले जाते. काही व्यावसायिक कचऱ्याचा पुनर्वापर करतात आणि त्याचे उपयुक्त आणि मौल्यवान वस्तूंमध्ये रूपांतर करतात. कचऱ्याची कार्यक्षम विल्हेवाट लावल्यास पर्यावरण स्वच्छ राहील. कचऱ्याचे व्यवस्थापन करून पैसे कमावता येतात. कचरा हे उत्पन्नाचे साधन बनवले जाऊ शकते.

एका अहवालानुसार, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन केल्यास सरकार दरवर्षी ३० हजार कोटी रुपये कमवू शकते. कचरा व्यवस्थापन आणि इतर कामांमध्येही करोडो लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. याचा परिणाम लोकांच्या खिशावर होईलच; पण पर्यावरणालाही मोठा फायदा होईल. सर्क्युलर इकॉनॉमी इन म्युनिसिपल सॉलिड अँड लिक्विड वेस्ट नावाच्या या अहवालात म्हटले आहे की, पुनर्वापर करता येण्याजोगा कचरा लँडफिल साइटवर टाकल्याने केवळ मौल्यवान संसाधनांचे नुकसान होत नाही, तर पर्यावरणालाही मोठा धोका निर्माण होतो. पुनर्वापर केलेल्या कचऱ्यापासून बनवलेल्या उत्पादनांवर सरकारने पाच टक्के जीएसटी कमी करावा.

एका अंदाजानुसार, भारतात दररोज सुमारे १.४५ लाख टन कचरा निर्माण होतो. यातील ३५ टक्के कचरा सुका आहे. कचऱ्यात सर्वात मोठा भाग प्लास्टिकचा असतो. अहवालानुसार, दररोज सुमारे २६ हजार टन प्लास्टिक कचरा निर्माण होतो. यापैकी केवळ १५ हजार ६०० टन कचरा रिसायकल करता येतो. यातील ९४०० टन कचऱ्यावर प्रक्रिया न करता थेट लँडफिल साइट, खड्डे किंवा इतर ठिकाणी फेकले जाते. या अहवालानुसार, सुक्या कचऱ्याचा पुनर्वापर करून दरवर्षी १७ हजार २३ कोटी रुपयांची बचत होते. पुनर्वापराचे काम आणि संसाधनांची दुरुस्ती आणि इतर कामांसाठी वर्षभरात ८० लाख दिवसांचा रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

ओल्या कचऱ्याबाबतच्या अहवालात म्हटले आहे की, दररोज ७५ हजार टन ओला कचरा निर्माण होतो, त्यापैकी ३२ टक्के कचऱ्याची विल्हेवाट लावली जात नाही. एका अंदाजानुसार या कचऱ्याची विल्हेवाट लावली आणि पुनर्वापर केला, तर दरवर्षी २४६० कोटी रुपये कमावता येतील. याद्वारे ६० लाख दिवसांचा रोजगारही निर्माण होऊ शकतो. ओल्या आणि सुक्या कचऱ्याशिवाय बांधकाम क्षेत्रातून दरवर्षी सुमारे १२० लाख टन कचरा येतो. यापैकी ९५ टक्के कचरा पुन्हा वापरता येईल, असे अहवालात म्हटले आहे. त्यासाठी प्रत्येक पाच चौरस किलोमीटरवर एक संकलन केंद्र असणे आवश्यक आहे.कचऱ्याची विल्हेवाट, पुनर्वापर, कचऱ्यापासून ऊर्जानिर्मिती या सगळ्याला कचरा व्यवस्थापन म्हणतात. पुनर्वापरामुळे अनेक उपभोग्य वस्तू पुन्हा बाजारात उपलब्ध होतात. त्यामुळे नैसर्गिक संसाधनांचे शोषण कमी होते. ॲल्युमिनियम, तांबे, स्टील, काच, कागद आणि अनेक प्रकारच्या प्लास्टिकचा पुनर्वापर करता येतो. धातूंचा पुनर्वापर करून मागणीनुसार अनेक वस्तू बाजारात उपलब्ध होतात आणि खाणकाम कमी होते. कागदाचा पुनर्वापर करून बरीच झाडे तोडण्यापासून रोखता येतील. त्याच वेळी, कचऱ्याची विल्हेवाट लावताना, लोक वापरत असलेल्या अन्नपदार्थांचा इष्टतम वापर सुनिश्चित करण्यासाठी घरांमधून तयार होणारा सेंद्रिय कचरा बायो-कंपोस्ट आणि मिथेन गॅसमध्ये बदलला जात आहे. मिथेन वायू हा ऊर्जेचा उत्कृष्ट स्रोत आहे, तर नैसर्गिकरीत्या जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी सेंद्रिय खत महत्त्वाचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे कृत्रिम खतांवरील अवलंबित्वही कमी होते. सेंद्रिय खतांपासून बनवलेल्या उत्पादनांना बाजारात चांगला भाव मिळतो. कचरा व्यवस्थापन हा शाश्वत विकासाचा महत्त्वाचा घटक मानला जातो. शाश्वत विकास म्हणजे पर्यावरणपूरक आणि दीर्घकालीन विकास. कचरा व्यवस्थापनामुळे उपभोग आणि पुनर्वापराचे चक्र निर्माण होते. त्यामुळे नैसर्गिक संसाधनांवरील आपले अवलंबित्व काही प्रमाणात कमी होते आणि त्यांचे शोषण कमी होते. त्यामुळे आजकाल शाश्वत विकासाचे नियोजन करताना कचरा व्यवस्थापनावर जास्त भर दिला जातो.

# मंडल आयोगाला विरोध करुनही ओबीसी व्होट बँक

## आरएसएस व भाजपसोबत... हे पुरोगामी पक्षांचे अपयश !




जाती तोडो, समाज जोडो या सामाजिक न्यायाच्या आंदोलनाच्या वेळीच संयुक्त सोशालिस्ट पार्टीने नारा दिला "संसोपा बाँधी गाठ, पिछडा पावें सौ में साठ." यातूनच पुढे बहुजन वर्गाच्या हिस्सेदारीचे आंदोलन डॉ. राम मनोहर लोहिया व लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली उभे राहिले. सन १९७७ नंतर या आंदोलनाने देशात सामाजिक न्याय आंदोलनाची, युगाची लाट उभी केली अनब या लाटेत प्रस्थापित राजकारण व सत्ता पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळून पडली. भारतीय राजकारणाचा चेहरा मोहराच या समाजवादी चळवळीने बदलून टाकला. भारतीय राजकारणाचा नेमका हाच चेहरा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित होता.

अनब डॉ. लोहियाच आपल्या स्वप्नातील भारत निर्माण करु शकतात, हा विश्वास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत असल्याने त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या स्थापने संदर्भातील खुले पत्र डॉ. लोहिया यांनाच लिहिले होते.

विद्यमान भारतीय राजकारण व संसदेचा स्तर नीच पातळीवर घसरल्याने संविधान अनब लोकशाही धोक्यात आली आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले राजकारण व पाहिलेली राजकीय स्वप्न अशा संकट समयी सहजच डोळ्यासमोर उभी राहतात. मग डॉ. लोहिया व जेपीची आंदोलने व सत्ता परिवर्तनाचे लढे दिसू लागतात. डॉ. आंबेडकरांनी लिहिलेल्या खुल्या पत्रातील रिपब्लिकन पक्ष तसाच उभा राहिला असता, जसा डॉ. आंबेडकर यांना हवा होता तसा, तर आज लोकशाही व संविधान धोक्यात आहे म्हणण्याची वेळ आपल्यावर आली नसती. संघ व भाजपने ही वेळ आपल्यावर आणली आहे, असे म्हणण्यापेक्षा आपण ती ओढावून घेतली आहे, हे आपण कबूल करु तेव्हाच संविधान व लोकशाही वाचविण्याची लढाई आपण जिंकू शकतो. ही वेळ पहिल्यांदा आत्म चिंतनाची आहे. त्यानंतर संविधान व लोकशाही वाचविण्याची. कारण आत्मचिंतनातुनच दुभंगलेली मने जुळतील. या लढाईसाठी ते आवश्यक आहे.

आरक्षण व्यवस्था ही अनुसुचित जाती, जमाती व ओबीसीच्या म्हणजे बहुजन वर्गाच्या भागीदारीसाठी संविधानाच्या चौकटीचे संरक्षण देवून उभी केलेली व्यवस्था आहे. ती केवळ कुणाला साहेब बनविण्यासाठी उभी केलेली नाही. हे काँग्रेसच्या कधीच लक्षात आले नाही. समाजवादी चळवळीच्या लक्षात आले, पण त्यांनी तो मुख्य मुद्दा कधीच बनविला नाही. बहुजन हा केवळ कष्टकरी असल्याने त्याचे शोषण होत आहे. जातीय पातळीवरील त्याचे शोषण डाव्यांना कधीच दिसले नाही. तर या आरक्षणामुळे समाजातील टॉलेंन्टला संधी मिळत नाही, असा कुप्रचार संघ व भाजपने केला. त्याचा प्रतिवाद करणे गरजेचे होते. पण त्याही भानगडीत कुणी पडले नाही. त्यामुळेच मंडल आयोगाला विरोध करुन सुद्धा भाजपने ओबीसी वोट बँक आपल्या सोबत उभी केली. है या देशातील पुरोगामी म्हणविणाऱ्या आंबेडकरी, समाजवादी, डावे पक्ष, संघटना व त्यांच्या नेत्यांचे अपयश आहे. काँग्रेसचे तर आहेच आहे.

याच दरम्यान, जिसकी जितनी संख्या भारी, उसकी उतनी हिस्सेदारी व वोट हमारा राज तुम्हारा, या घोषणा देत देशात दलित आंदोलन उभे राहिले. या आंदोलनाने चेतना निर्माण केली. समाजाला जागृत केले. समाजाची एकजूट केली. अनब या एकजूट समाजाच्या मतांचा सौदा पुढे या आंदोलनातून उभ्या राहिलेल्या नेतृत्वाने केला. वंचित व बसपा करीत असलेल्या राजकारणामुळे तर "कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ", असे म्हणण्याची वेळ आली आहे. ज्या संघ व भाजपमुळे या देशाचे संविधान व लोकशाही धोक्यात आली आहे, त्याच संघ व भाजपला सरळसरळ मदत करण्याची भूमिका प्रकाश आंबेडकर व मायावतींनी तीं घेतली आहे, असे मतांचे ठेकेदार अनेक निर्माण झाले आहेत. आता ते ओबीसीत ही होत आहेत. अथवा त्यांना मतं विभाजनासाठी उभे केले जात आहे.

संपूर्ण क्रांतीचा नारा देत लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी सुरु केलेले आंदोलन हे खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय व भागीदारीचेच आंदोलन होते. त्या आंदोलनाला गंभीर न घेतल्याने इंदिरा गांधींचा धीं दारूण पराभव झाला. पण दुर्दैव हे की त्यापासून काँग्रेस काहीच शिकली नाही.

आज काँगेस केवळ नावापुरती उरली आहे. अशा वेळी राहुल गांधी या भागीदारी व हिस्सेदारी विषयी बोलत आहेत. पण ते व्यवहारात व निवडणुकीच्या मैदानात कुठेच दिसत नाही. महाराष्ट्रात भाजप एक ही जागा मुस्लिम समाजाला सोडत नाही. तीच परिस्थिती काँग्रेसची आहे. राज्यात धनगर समाजाची संख्या सव्वा कोटीच्या आसपास आहे पण काँग्रेस, राष्ट्रवादी अथवा उद्धव सेना एक ही जागी धनगर उमेदवार देत नाही. उलट भाजप देत आहे. या राजकारणाला म्हणायचे तरी काय ?

स्वातंत्र्य भारतात लोकसभेसाठी १७ वेळा निवडणुका झाल्या पण ११ ते १२ टक्के मतदान असलेल्या धनगर समाजाचा एक ही खासदार आजपर्यंत लोकसभेवर निवडून गेला नाही. गेल्या चार टर्म काँग्रेस व राष्ट्रवादीने एकाही मुस्लिम नेत्याला लोकसभेवर पाठविले नाही. मुस्लिम समाजाची टक्केवारी ही ११ ते १२ टक्के इतकीच आहे. एकूण मतदानाच्या २४ टक्के असलेले हे समाज खऱ्या अर्थाने वंचित असून त्यांना काँगेसच्या राजकारणामुळे वंचित राहवे लागले आहे. विधानसभेतील चित्र ही यापेक्षा वेगळे नाही.

अनुसुचित जाती व जमातीला आरक्षण असल्याने ते निवडून जातात. आरक्षण नसते तर त्याची अवस्था या पेक्षा ही बिकट असती. सन २०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीच्या वेळी प्रकाश अण्णा शेंडगे व अण्णा डांगे यांच्या नेतृत्वाखाली धनगर समाजाचे एक शिष्टमंडळ शरद पवारांना भेटले होते. यावेळी त्यांनी धनगरांचा प्रभाव असलेल्या माढा, सोलापूर, सांगली, बारामती, बीड, परभणी, उस्मानाबाद व अहमदनगर या लोकसभा मतदासंघांपैकी २ जागा धनगर समाजाला द्या, अशी मागणी केली होती. पण पवारांनी त्यांच्या मागणीला केराची टोपली दाखवली अनब धनगरांनी या सर्व ठिकाणीं काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला पाडले. या आठपैकी दोन जागांवर धनगर उमेदवार देवून आठ ही जागा सहज निवडूण आणता आल्या असत्या. पण जाणत्या राजाकडे ही समजच नव्हती व आज ही नाही. असती तर महादेव जानकर यांच्या ऐवजी त्यांनी यापैकी एक जागा या धनगर नेत्यांसाठी सोडली असती. जानकरावर ही त्यांचे काही प्रेम नव्हते. बारामती सेफ करण्यासाठीं ते उदार झाले होते. थोडक्यात स्वहिताचेच राजकारण यामागे होते.

काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे हे राजकारण राज्यातील धनगर, मुस्लिम, अन्य अनुसूचित जाती-जमाती व एकूणच बहुजन समाजाच्या लक्षात आल्याने त्याने या दोन्ही पक्षाकडे पाठ फिरवली आहे. यावेळी तो केवळ संविधान व लोकशाही विरोधी भाजपचा पराभव करण्यासाठीच साथ देत आहे. है काँगेस व राष्ट्रवादी काँगेसच्या शरद पवार यांच्यासह सर्व नेत्यांनी लक्षात घ्यावे.

**जयभीम, जय समाजवाद,**
**जय संविधान....!!**
**राहुल गायकवाड,**
**महासचिव, समाजवादी पार्टी,**
**महाराष्ट्र प्रदेश**

# शाहू महाराज पुण्यतिथीनिनित्त स्मशानभूमी सौंदर्यीकरणाचा संकल्प

## खोडशिवनी ग्रामपंचायतीचा पुढाकार: कामाला केली सुरुवात, समाजबांधवांनी दिला निधी



**सडक अर्जुनी:** तालुक्यातील खोडशिवनी येथे राजर्षी शाहू महाराज पुण्यतिथीनिमित्त स्मशानभूमी सौंदर्यीकरण करण्याचा संकल्प ग्रामपंचायत व गावकऱ्यांनी केला.

खोडशिवनी गावालगत चूलबंद नदीघाटावर मृतकांवर अंत्यसंस्कार करण्यात येतात. पुर्वी या घाटावर आंब्यांची झाडे मोठ्या प्रमाणात होती; परंतु काळानुसार ती नष्ट होत चालली. त्यामुळे अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्यांना उन्हाचे चटके सोसावे लागतात. यासंदर्भात काही उपाययोजना करता येईल का यावर चर्चा करण्यात आली. त्यानुसार येथे सपाटीकरण करणे, झाडे लावणे, पाण्याची व्यवस्था तसेच लोखंडी शवदायिनी उभारणे आदी कामे करण्याचा निर्णय ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी घेतला. या ठिकाणी यमराज मंदिर उभारण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

गावातील वेगवेगळ्या समाजाच्या सामाजिक कमिट्या यासाठी तयार करण्यात आल्या आहेत. कोहळी समाजाच्यावतीने यासाठी निधी गोळा करण्यात आला आहे.

राजर्षी शाहू महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त गावातील प्रमुखांनी चर्चा करुन कामाला सुरुवात करण्यात आली. या कामाची पाहणी सरपंच गंगाधर परशुरामकर, पोलिस पाटील भृंगराज परशुरामकर, पं.स. सदस्य डॉ. आर.बी. वाढई, उपसरपंच सत्येवान नेवारे, सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष उद्धव परशुरामकर, पतिराम परशुरामकर, महेश बोरकर, विठोबा पुस्तोडे, रामदास मस्के यांनी केली.

# गोंदियात बुद्ध जयंती २३ मे रोजी रॅलीचे आयोजन, भन्ते करुणाकरण व निशा बौद्ध यांची उपस्थिती





**गोंदिया :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्व. जयंती उत्सव समितीच्या वतीने पुढील महिन्यात होणाऱ्या बुद्ध जयंतीच्या कार्यक्रमानिमित्त तय्यारी सुरु झाली आहे. येथील भीमनगरच्या भव्य मैदानावर ता.२३ आणि २४ मे रोजी दोन दिवसीय कार्यक्रम आयोजित आहे. दिनांक २३ मे रोजी रॅलीचे आयोजन असून ही रॅली शहरात भ्रमण करून तथागत बुद्धांचा संदेश प्रसारित करेल.

जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष आयु. गेंदलाल तिरपुडे यांनी दिलेल्या माहितीनुसार या दोन दिवशीय कार्यक्रमा दरम्यान दिनांक २४ मे रोजी,उत्तर प्रदेश येथील धम्मगुरु भन्ते करुणाकरण यांचे बुद्ध तत्वज्ञान आणि संवैधानिक राजकारण या वर प्रबोधन होईल. तसेच राजस्थान भरतपूर येथील बहुजन मिस्सनरी गायिका निशा बौद्ध यांचा संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय जयंती समितीने घेतला असल्याचे माध्यमाना सांगितले.

श्री तिरपुडे यांनी असेही निवेदन केले आहे की, बहुजन समाजाने बुद्ध जयंतीदिनी घरोघरी विद्युत रोषणाई करावी, पंचशील ध्वज उभारावेत, हातात मेणबत्त्या घेऊन बुद्धविहारात जाणे, आणि शेजारी पाजारी तसेच आगंतुकांना सुजाता खीर चे वितरण करून बुद्ध जयंतीच्या शुभेच्छा देण्याचे आवाहन धम्म बांधवाना केले आहे.

# सूर्यदिव मांडोदेवी देवस्थान येथे ८१ जोड्यांचे विवाह संपन्न



**गोरेगाव:-** दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा १७ एप्रिल २०२४ रोजी रामनवमीच्या शुभ मुहूर्तावर श्री सूर्यादेव मांडोदेवी देवस्थान बघेडा/तेढा यांच्या वतीने सामूहिक विवाहाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ८१ जोड्यांची नोंदणी करून विवाहबद्ध झाली.

दरवर्षी रामनवमीच्या शुभ दिवशी कोणतेही शुल्क न घेता सामुहिक विविः सोहळ्याचे आयोजित करण्यात येते. यंदा या विवाह सोहळाचे हे ३२ वे वर्ष आहे. विवाह करणाऱ्या प्रत्येक वर- वधूना जीवनावश्यक वस्तु, वस्त्र तसेच सोन्याचे मंगळसूत्र देण्यात आले. वेळ आणि पैशांची बचत करण्यासाठी सामूहिक विवाह सोहळा आयोजित करणे हिकालाची गरज आहे असे विधान संस्थेचे अध्यक्ष आमदार विनोद अग्रवाल यांनी व्यक्त केले.

दरवर्षी अनेक धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च सन्मान सामाजिक न्याय विभागाचा फुले, शाहू, आंबेडकर पुरस्कार प्राप्त करणारी मध्य भारतातील पहिली धार्मिक संस्था म्हणून या संस्थानाचे नाव लौकिक आहे. ज्यामध्ये सर्व धर्मांची समानता पाळून कार्य केले जाते.

मांडोदेवी देवस्थान हे मध्य भारतातील प्रसिद्ध पर्यटन आणि तीर्थक्षेत्र असून नियमित ३ ते ४ हजार भाविक व पर्यटक भेट देत असतात. या ठिकाणी ५० हून अधिक दुकाने आणि हॉटेल्स असून रोजगार प्राप्त करत आहेत. आरोग्य शिबिराच्या माध्यमातून दरवर्षी आरोग्य सेवा व इतर मार्गदर्शन शिबिरांसाठी ही संस्था प्रसिद्ध आहे. दररोज विवाह सुविधा उपलब्ध असून यामध्ये दरवर्षी सुमारे ५०० जोड्यांचे विवाह संपन्न केले जाते. आजपर्यंत या संस्थेमार्फत हजारोहून अधिक जातीय व आंतरजातीय विवाह संपन्न झाले आहेत.

या विवाह सोहळ्याला योग्यरीत्या पूर्ण करण्यासाठी संथेचे अध्यक्ष आमदार विनोद अग्रवाल यांनी मार्गदर्शन केले तर सचिव जिल्हा परिषद सदस्य डॉ. लक्ष्मण भगत उपाध्यक्ष भैयालाल सिंदराम, कोषाध्यक्ष विश्वनाथ असाटी, सह सचिव कुशन घासले, सदस्य श्री डॉ. जितेंद्र मेंढे शालिकराम उईके, सखाराम सिंदराम, दिलीप खंडेलवाल, राहुल अग्रवाल आणि मंदिर चे पुजारी पंडित अयोध्यादास महाराज परिश्रम घेतले.

# लोककल्याणकारी राजर्षी छत्रपती शाहू महाराज

छत्रपती शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कसबा बावडा येथे झाला. १८८४ साली ते छत्रपतींच्या कोल्हापूर गादीवरती दत्तक म्हणून आले. १८८४ ते १८९४ या दहा वर्षात त्यांनी राजकोट आणि धारवाड या ठिकाणी उच्च शिक्षण पूर्ण केले. १८९४ साली त्यांचा राज्याभिषेक झाला.

राज्याभिषेकानंतर त्यांनी आपल्या राज्याचा दौरा केला. डोंगरदऱ्यात राहणाऱ्या कष्टकरी, श्रमकरी, शेतकरी, वंचित, उपेक्षित, भूमिहीन प्रजाजनांचे दुःख पाहून त्यांचे मन हेलावले, छत्रपतीच्या अंतःकरणामध्ये प्रचंड वात्सल्य होते. ते जसे स्वाभिमानी होते, तसेच ते प्रेमळ होते. आपल्या राज्यात अमुलाग्र बदल करण्याचा संकल्प त्यांनी केला. राज्यारोहणामुळे शाहू महाराजांचा सत्कार पुण्यातील सार्वजनिक सभेने आयोजित केला होता, त्यादरम्यानच पुण्यात हिंदू-मुस्लिम दंगल झालेली होती आणि या दंगलीला टिळकाची मदत होती, टिळक हे वयाने शाहू महाराजांपेक्षा वीस वर्षांनी मोठे होते. सत्कार प्रसंगी शाहू महाराज म्हणाले "हिंदू-मुस्लिमांनी एकोप्याने राहावे, भांडण करू नये" शाहू महाराजांची वयाच्या विसाव्या वर्षीची प्रगल्भता ही त्यांच्या महान व्यक्तिमत्त्वाची प्रचिती आहे. टिळक दंगल घडविण्याच्या बाजूचे तर शाहू महाराज शांतता प्रस्थापित करणारे होते.

शाहू महाराजांनी आपल्या राज्यात शिक्षणाचा प्रसार केला. प्राथमिक शिक्षण सर्वांसाठी सक्तीचे आणि मोफत केले. शिक्षणाशिवाय तरुणोपाय नाही, हे त्यांचे विचार होते. मंदिरातील पैसा शिक्षणासाठी वापरला. सर्व जाती धर्मातील मुलांसाठी कोल्हापुरात वसतिगृहांची स्थापना केली. मराठा बोर्डिंग, मुस्लिम बोर्डिंग, जैन बोर्डिंग, दलित बोर्डिंग, लिंगायत बोर्डिंग इत्यादी बोर्डिंगची स्थापना शाहू महाराजांनी केली.

पुणे येथील श्री. शिवाजी मराठा सोसायटी, ऑल इंडिया श्री. शिवाजी मेमोरियल सोसायटी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, नाशिक येथील उदाजी मराठा शिक्षण संस्था, नागपूर येथील शिक्षण संस्था, चेन्नई येथील शिक्षण संस्था अशा अनेक शैक्षणिक संस्था उभारण्यात शाहू महाराजांचा पुढाकार होता. रयत शिक्षण संस्था स्थापन करणारे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण शाहू महाराजांच्या राजवाड्यावर राहून झाले. त्यांनी मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले.

राजर्षी शाहू महाराजानी १९१७ साली विधवा पुनर्विवाहाचा कायदा केला. १९१९ साली आंतरजातीय विवाहाचा कायदा केला. बाजारपेठ स्थापन केली. जयसिंगपूर शहराची स्थापना केली. त्यांनी भारतातील सर्वाधिक जलसाठ्याचे राधानगरी हे पहिले धरण भोगावती नदीवर १९०८ साली बांधले. छत्रपती शिवाजी राजांचा जगातील पहिला अश्वारूढ पुतळा १९२१ साली पुणे या ठिकाणी प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हस्ते उभारला. पहिले शिवचरित्र लिहिणाऱ्या कृष्णाजी अर्जुन केळुस्कर यांच्या पाठीशी ते खंबीरपणे उभे राहिले.

१८९९ साली वेदोक्ताचा अधिकार नाकारणाऱ्या पुरोहिताची त्यांनी हकालपट्टी केली. बहुजन पुरोहित तयार करणारी शिवाजी वैदिक शाळा त्यांनी सुरू केली. डोणे नावाचे धनगर विद्वान त्या शाळेचे प्राचार्य होते. भास्करराव जाधव यांनी घरचा पुरोहित नावाचे पुस्तक लिहिले. बहुजनांचा आणि ब्राह्मणांचा धर्म एक नाही, हे त्यांनी स्वतंत्र धर्माची स्थापना करून सिद्ध केले. स्वतंत्र धर्मपीठावर त्यांनी सदाशिव लक्ष्मणराव पाटील बेनाडीकर या विद्वानाची नियुक्ती केली.

शाहू महाराजांनी आपल्या राज्यात कधी भेदाभेद केला नाही. याउलट उपेक्षित, वंचित, भूमिहीन, अस्पृश्य, शेतकरी, कष्टकरी, श्रमकरी जातींना त्यांचा डावललेला हक्क अधिकार मिळावा, यासाठी १९०२ साली आरक्षणाची सुरुवात केली. भारतात आरक्षणाचा पाया घालणारा राजा म्हणजे शाहू महाराज होय. प्रशासनातील एकाधिकारशाहीला त्यांनी पायबंद घातला. त्यांनी सर्व जातींना प्रशासनात प्रतिनिधित्व दिले. त्यांनी मराठा समाजालाही आरक्षण दिले की जे आज चया व्यवस्थेने हिरावून घेतले.



शाहू महाराज हे बुद्धिप्रामाण्यवादी होते, त्यांनी भविष्य, पंचांग, मुहूर्त कधीही पाहिला नाही. भविष्य सांगण्यासाठी आलेल्या जोतिष्याला तुरुंगात डांबून त्याला बुद्धिप्रामाण्यवादाचे महत्व पटवून दिले. त्यांनी भाकडकथा, पुराणकथा नाकारून प्रतिगामी विचारांना नेस्तनाबूत केले. त्यांनी ग्रंथप्रामाण्य नाकारले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राज्यात कृषी क्षेत्रात आमूलाग्र क्रांती केली. नगदी पिकांना चालना दिली. पन्हाळा टी-४ हा चहाचा वाण विकसित करून त्याची लागवड केली. तो चहा निर्यात होत असे. त्यांनी शेतीत आधुनिकीकरण आणले. शेतीसाठी बाजारपेठ उभारली. पाणीपुरवठ्याची सोय केली. शेतीला जोडधंदा म्हणून अनेक उद्योगांची उभारणी केली.

आपल्या राज्यात समता प्रस्थापित करण्यासाठी शाहू महाराजांनी आपले राजेपद पणाला लावले. ज्या जातींना गुन्हेगार ठरवण्यात आलेले होते, अशा जातीवरचे निर्बंध राजांनी उठवले. त्यांना नियमित हजेरीतुन मुक्त केले. त्यांना आपल्या राज्याच्या संरक्षण खात्यात महत्त्वाच्या पदावरती नेमले. अस्पृश्यता नष्ट व्हावी, यासाठी ते अस्पृश्याच्या घरी जेवले. अस्पृश्यांना आपल्या राजवाड्यावर स्नेहभोजन ठेवले. अन्यायग्रस्त गंगाराम कांबळेला न्याय देऊन त्याला हॉटेल टाकून दिले. त्या हॉटेलला प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, यासाठी स्वतः शाहू महाराज आपल्या सहकाऱ्यांना घेऊन हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी जात असत. महार, मांग, चांभार इत्यादी पैलवानाबरोबर देशभरातून आलेल्या पैलवानांनी कुस्ती खेळावी म्हणून त्यांना जाट, सरदार, पंडित अशी नावे दिली.

महिलांचा आदर सन्मान करणारे त्यांचे धोरण होते. विधवा पुनर्विवाह कायदा केला. त्यांना शिक्षण मिळावे यासाठी अनेक योजना सुरू केल्या. आपल्या कुटुंबातील स्त्रियांना शिक्षण दिले. महाराणीच्या हस्ते धरणाचे उद्घाटन केले तर कन्या राधाबाई यांचे नाव धरणाला दिले. तेच इतिहासप्रिद्ध राधानगरी धरण आहे.

जातिभेद नष्ट व्हावा, यासाठी शाहू महाराजांनी आंतरजातीय विवाहाला चालना दिली. याची सुरुवात त्यांनी स्वतःच्या कुटुंबापासून केली. त्यांनी आपली बहीण चंद्रप्रभादेवी यांचा विवाह इंदोरचे यशवंतराव होळकर यांच्या बरोबर निश्चित केला, तो पुढे राजाराम महाराजांनी लावून दिला, असे सुमारे २५ आंतरजातीय विवाह घडवून आणले, यातून त्यांनी मराठा- धनगर आणि इतर जाती एकमेकांचे विरोधक नसून नातेवाईक आहेत, हे सिद्ध केले. म्हणजे शाहू महाराज हे केवळ बोलके सुधारक नव्हते, तर कर्ते सुधारक होते,

छत्रपतींची परंपरा जातीव्यवस्था मोडणारी व समता प्रस्थापित करणारी परंपरा आहे. छत्रपतींची परंपरा जातीव्यवस्था पाळणारी विषमतावादी परंपरा नाही. छत्रपतींची परंपरा प्रगल्भ परंपरा आहे, ती संकुचित नाही.

शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उच्च शिक्षणासाठी सर्वतोपरी मदत केली. मूकनायक या नियतकालिकासाठी मदत केली. शाहू महाराज म्हणाले "बाबासाहेब आंबेडकर हे देशाचे नेते आहेत आणि तेच खरे लोकमान्य आहेत". शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या मुंबई येथील घरी जाऊन त्यांचा सत्कार केला, याप्रसंगी शाहू महाराज म्हणाले "रमाबाई माझी धाकटी बहीण आहे, तुम्ही लंडनवरून परत येईपर्यंत मी तिला माहेरी कोल्हापूरला घेऊन जातो"

माणगाव आणि नागपूर येथील परिषदेत जाऊन शाहू महाराजांनी बाबासाहेबांना खंबीर पाठिंबा दिला. शाहू महाराजांनी बाबासाहेबांना सोनतळी कॅम्प वरती स्नेहभोजन दिले आणि मानाचा जरीपटका देऊन सत्कार केला. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात "छत्रपतींनी मानाचा जरीपटका माझ्या मस्तकी चढविला, त्याचा मी सदैव सन्मान राखीन"

शाहू महाराजांच्या मुला-मुलींच्या लग्नात करवले म्हणून भटक्या विमुक्त, दलित जातीतील समवयस्क मुला-मुलींना सोबत घेतले होते, जेणेकरून विषमता नष्ट व्हावी व सामाजिक सलोखा निर्माण व्हावा, हे शाहू महाराजांचे धोरण होते.

शाहू महाराजांनी आपल्या राज्यात हिंदू-मुस्लिम हा भेद केला नाही. मुस्लिमांच्या शिक्षणासाठी त्यांनी मुस्लिम बोर्डिंगची स्थापना केली. आपल्या राज्यातील गरिबातल्या गरीब मुस्लिमांना कुराण मराठी भाषेत वाचता यावे, यासाठी अरबी भाषेतील कुराणाचे मराठी भाषांतर करण्यासाठी पंचवीस हजार रुपयाची देणगी दिली. शंभर वर्षांपूर्वीची ही रक्कम खूप मोठी रक्कम आहे. शाहू महाराजांनी पाटगावच्या मौनी बाबाच्या मठाच्या उत्पन्नातील रक्कम तेथील मुस्लिमांच्या मशिदीच्या बांधकामासाठी दिली, तर रुकडीतील पिराच्या देवस्थानाच्या उत्पन्नातील रक्कम तेथील अंबाबाई मंदिराच्या बांधकामासाठी व दिवाबत्तीसाठी दिली, इतका सामाजिक सलोखा शाहू महाराजांच्या राज्यात होता

शाहू महाराजांनी शाहीर लहरी हैदर, चित्रकार आबालाल रहमान, गानमहर्षी अल्लादिया खाँसाहेब, मल्लविशारद बालेखान वस्ताद, बालगंधर्व यांना सर्वतोपरी मदत केली. शाहू महाराजांनी सामाजिक समतेसाठी आणि सामाजिक सलोख्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले. शाहू महाराजानी आपल्या राज्यात सर्वांचा विकास आणि शांतता प्रस्थापित व्हावी, यासाठी सनातनी व्यवस्थेविरुद्ध उघडपणे संघर्ष केला, परंतु आज सामाजिक वातावरण बिघडवले आहे, जातीजातीत आणि धर्माधर्मात विष पेरले जात आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. सर्व समाज बांधवांनी एकोपा जपावा, हे शाहूचरित्र सांगते.

शाहू महाराजांचा सामाजिक सलोखा आपण कायम ठेवणे, हेच खरे शाहू प्रेम आहे. शाहू राजांची जयंती (२६ जून) सणासारखी साजरी करा, असे डॉ. आंबेडकरांनी सांगितले आहे. त्यांच्या विचारांचे आपण आचरण करूया. शाहू महाराजांचा स्मृतिदिन (६ मे) आहे. त्यांचे हे स्मृती शताब्दी वर्ष आहे. स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**डॉ.श्रीमंत कोकाटे**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)

# देवरीच्या उड्डाणपुलाला मुहूर्त सापडेना, लोकांचे जीव टांगणीला



**देवरी:-** महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकाला वसलेल्या देवरी शहराच्या मधोमध राष्ट्रीय महामार्ग गेलेला आहे. दररोज हजारोच्या संख्येने अवजड वाहनाची रेलचेल देवरी शहरात बघावयास मिळते. देवरी शहर तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे हजारोच्या संख्येत ग्रामीण भागातील लोक कार्यालयीन, शेतीविषयक आणि खाजगी कामानिमित्त येत जात असतात. राष्ट्रीय महामार्गावरील भरधाव वाहनामुळे जीव मुठीत घेऊन रस्ता ओलांडण्याची कसरत सर्व जनतेला परिचयाची आहे.

महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकावर असलेल्या देवरी शहरातून महामार्ग ६ (मुंबई ते कोलकाता) गेलेला असून ठढज चेक पोस्ट असल्याने मोठ्या प्रमाणात जळवाहनांची वरदळ असते. राष्ट्रीय महामार्गावर देवरी शहर वसलेले असून मुख्य बाजारपेठ, शाळा, महाविद्यालये आणिशिक्षणासाठी ग्रामीण भागातून मोठ्याप्रमाणात विद्यार्थी, मजूर, कामगार आणि सर्वसामान्य नागरिक शहरात हजेरी लावत आहेत. शहराच्या मधोमध गेलेल्या महामार्गावर उभे असलेल्या अनाधिकृत पार्क केलेल्या ट्रक व जळवाहनांमुळे महामार्गावरून येणारे जाणारे वाहन दिसत नसल्यामुळे जिव मुठीत घेऊन रस्ता ओलांडावा लागत आहे.

कित्तेक वर्षापासून देवरी येथे उड्डाणपुलाची मागणी नागरिक करीत आहेत तरी सुद्धा लोणी खाणारे जनप्रतिनिधी गुंगीची औषध घेऊन या गोष्टीकडे दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र आहे.

विशेष म्हणजे महिला, विद्यार्थी, वृद्ध नागरिक शहरातील अग्रसेन चौक, अवंती चौक, तहसील कार्यालय, बस स्थानक, धुकेश्वरी मंदिर चौक या परिसरातून रस्ता ओलांडत असतांना भरधाव वाहनामुळे संकटात असल्याचे दिसून येते. यावर उपाय म्हणून देवरी शहरातून जाणाऱ्या महामार्गावर उड्डाणपुलाची मागणी शहरातील जेष्ठ नागरिक, सामाजिक संघटना, जनसामान्य नागरिक करीत आहेत.

विशेष म्हणजे रस्त्याच्या कडेला अनधिकृत वाहने पार्क केल्यामुळे भरधाव येणाऱ्या वाहनाचा अंदाज येत नसल्यामुळे अपघाताच्या समस्येत वाढ झाल्याचे दिसून येते.

शहरातील सर्विस रस्ते सामान्य नागरिकांना येजा करण्यासाठी तयार करण्यात आलेले आहेत परंतु देवरी शहरातील सर्विस रस्त्यावर सर्रास अतिक्रमण झाल्याचे दिसून येते त्यामुळे वृद्ध नागरिक विद्यार्थ्यांचे किरकोळ अपघात दररोज घडत असतांना सबंधित विभाग कारवाई करण्यास गप्प का बसले आहे असा सवाल उपस्थित होत आहे.

# यंदा शाळांना तब्बल ४५ दिवसांच्या उन्हाळी सुट्या

**गोंदिया:** शालेय स्तरावरच्या वार्षिक परीक्षा आटोपल्या आहेत. १ मे रोजी निकाल लागणार आहे. त्यानंतर प्राथमिक, माध्यमिक शाळांना १५ मे पासून उन्हाळी सुट्या लागणार आहेत. सन २०२४-२०२५ चे नवे शैक्षणिक सत्र १ जुलैपासून सुरु होणार आहे. त्यामुळे जवळपास दोन महिने विद्यार्थ्यांसह शिक्षकांना सुट्यांचा आनंद घेता येणार आहे.

दरवर्षीच विद्यार्थी उन्हाळी सुट्यांची प्रतीक्षा करीत असतात. कुणी बाहेरगावी जाण्यासाठी तर कुणी बाहेर फिरायला जाण्याचे नियोजन करीत असतात. दरम्यान, सर्वच प्राथमिक व माध्यमिक विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा संपल्या आहेत. जिल्ह्यातील प्राथमिक शाळांना १ मे महाराष्ट्र दिवस साजरा झाल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवसापासून उन्हायळ्याच्या सुट्या लागणार आहेत. विदर्भातील शाळा उन्हाळ्याची तीव्रता पाहता १ जुलैपासून नवीन शैक्षणिक सत्राचा शाळेत पहिला टोला पडणार आहे. पुर्वी २६ जूनपासून शाळा सुरु होणार होती.मात्र विदर्भात तप्त उन्हाच्या झळा जुन महिन्यातसुद्धा असतात. त्यामुळे १ जुलैपासून शाळा सुरु होणार आहेत.



## विद्यार्थ्यांना उपस्थितीची सवलत

**तापमानात प्रचंड वाढ होत आहे. परीक्षाही झाल्या आहेत. त्यामुळे राज्य मंडळाच्या सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थित राहण्यास २२ एप्रिलपासून सवलत दिली आहे. तसेच १९ एप्रिल रोजी शालेय शिक्षण विभागाच्या उपसचिवांनी पत्र जारी केले आहे. तथापि शाळा उपक्रम राबवीत असल्यास शाळास्तरावर सवलतीबाबत निर्णय घ्यायचा आहे.**

## सुट्यांचे नियोजन सुरु

**उन्हाळ्यात शाळेला सुट्या असतात. त्यामुळे पालक अनेक ठिकाणी जाण्याचे नियोजन करीत असतात. यंदाही अनेकांनी टूर प्लॅन केले आहेत. तर काही जण आपल्या नातेवाईकांकडे जाण्याचे नियोजन करीत आहे. सुट्यांचा मुलांमध्ये उत्हास दिसून येत आहे.**

## विद्यार्थ्यांसाठी शोधाशोध

**अनेक शाळेत पटसंख्या टिकवून ठेवण्यासाठी शिक्षकांना विद्यार्थ्यांची शोधाशोध दरवर्षीच करावी लागत असल्याचे दिसून येते. भर उन्हात शिक्षकांना विद्यार्थ्यांचा शोध घ्यावा लागतो. त्यामुळे शिक्षक आतापासून नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा शोध घेत आहेत.**

# गोठणपार हत्याकांडातील चारही आरोपी अल्पवयीन मुलांची बाल सुधारगृहात रवानगी

## सामूहिक अत्याचार करून केली बालिकेची हत्या

**गोंदिया:-** जिल्ह्यातील देवरी तालुक्यातील गोठणपार येथे लग्न समारंभात आलेल्या १२ वर्षीय मुलीचे अपहरण करून अत्याचार केल्यानंतर हत्या केल्याप्रकरणी देवरी तालुक्यातीलच चिल्हाटी गावातील ४ अल्पवयीन मुलांना पोलिसांनी ताब्यात घेत नागपूर येथील बाल सुधारगृहात रवानगी केल्याची माहिती अप्पर पोलीस अधिक्षक नित्यानंद झा यांनी पत्रपरिषदेत दिली.

कुठलेही सबळ पुरावे नसल्याने आरोपींचा शोध घेतांना अडचणी निर्माण झालेल्या होत्या, अशा परिस्थितीत पोलिसांनी मोठ्या शिताफ्फीने या घटनेचा तपास करून आश्रमशाळेतील इयत्ता १२ वीत असलेल्या चार विद्यार्थ्यांना ताब्यात घेत चौकशी केली असता दोघांनी गुन्ह्याची कबुली दिली.

१९ एप्रिलला पीडित मुलगी आपल्या बहिणी सोबत देवरी तालुक्यातील चिचगड पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या गोठणपार गावात लग्न समारंभात आली होती. पीडित मुलीच्या मित्राने तिला आपल्या दुचाकीवर बसवून वडेकसा जंगलात घेऊन गेला. तिथे असलेल्या ४ मित्रांनी पीडितेवर जंगलात सामूहिक अत्याचार करून दगडाने डोक्यावर वार करीत हत्या करीत पळ काढला. २० एप्रिलला सकाळी पीडितेच्या शोध घेतला असता गावकऱ्यांना पीडित मुलीचा मृतदेह जंगलात मोहफुल वेचायला गेलेल्याना आढळला. पोलिसांना याची माहिती देण्यात आली.

सदर घटनास्थळी मोबाईल नेटवर्क सुद्धा नसल्याने पोलिसांना आरोपीचा शोध घेण्यात अडचण निर्माण होत असल्याने पोलिसांनी ६ विविध पथके तयार करून या संदर्भात तपास केला असता पीडितेच्या मोबाईल वरून काही मुलांशी चॅटींग समजून आल्याने आणि हत्येचा वेळ सारखा असल्याने पोलिसानी तपास चक्रे फिरवीत ४ अल्पवयीन मुलांना ताब्यात घेत चौकशी केली. त्यातील २ मुलांनी गुन्हा केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. कलम ३०२, ३७६, ३६३, पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर या चारही विधिसंघर्ष बालकांची रवानगी नागपुर येथील बाल सुधारगृहात करण्यात आल्याची माहिती दिली.

## खरीप हंगामातील धानाची त्वरीत उचल करुन रब्बी हंगामातील धान खरेदीचा मार्ग मोकळा करा



**गोंदिया:-** जिल्ह्यात रब्बी हंगामात मोठ्या प्रमाणात धानाची शेती करण्यात येते. खरीप हंगामातील खरेदी केलेले धान अद्याप धान खरेदी केंद्रावर असून यामुळे रब्बी हंगामातील धान खरेदी रखडण्याची शक्यता आहे. कारण जुने धान उचल केल्याविना नवीन धान खरेदी सुरु करता येणार नाही. म्हणून खरीप हंगामातील धानाची उचल करून रब्बी हंगामातील धान खरेदीचा मार्ग मोकळा करण्यात यावे.

याकरिता माजी पालकमंत्री व माजी सामाजिक न्याय मंत्री इंजि.राजकुमार बडोले यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने (दि.२९) जिल्हाधिकारी यांची भेट घेत समस्या मार्गी लावण्याची मागणी केली. यावेळी जिल्हा परिषदचे अर्थ व बांधकाम सभापती संजय टेंभरे, जिल्हा परिषद सदस्य डॉ. लक्ष्मण भगत, सडक अर्जुनी पंचायत समितीचे उपसभापती शालिंदर कापगते, भाजप किसान आघाडी जिल्हा महामंत्री अशोक हरीणखेडे,नरेश चौधरी,देवलाल पटले उपस्थित होते.

# आरटीओने मिळवून दिला ६० कोटींचा महसूल




**गोंदिया :-** उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये उच्चांकी ५९ कोटी २९ लक्ष इतका शासकीय महसूल महाराष्ट्र शासनाला मिळवून दिला आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी तब्बल ६ कोटींचा जास्तीचा महसूल प्राप्त झालेला आहे.

यामध्ये प्रामुख्याने वाहनावरील कर, विविध सेवांकरिता शुल्क तसेच दंडवसुली इत्यादींचा समावेश आहे. यावर्षी कार्यालयामार्फत १७ हजार ४५७ दुचाकी, १ हजार ८२८ चारचाकी व इतर २ हजार ६८४ अशा एकूण २१ हजार ९६९ इतक्या वाहनांची नोंदणी करण्यात आलेली आहे. कार्यालयाच्या वायुवेग पथकाने ४ हजार ६४९ वाहनांवर कारवाई करुन ०१ कोटी ५१ लक्ष इतकी दंडवसुली केलेली आहे, तर सीमा तपासणी नाका देवरी येथून ७ कोटी १८ लक्ष इतका महसूल प्राप्त झालेला आहे.

गोंदिया जिल्हा नक्षलप्रभावीत, आदिवासी बहुल तसेच मागासलेला असूनही उप प्रादेशिक परिवहन गोंदिया कार्यालयाने मोठया प्रमाणात शासनाला महसूल मिळवून दिलेला आहे, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राजवर्धन करपे यांनी सांगितले.

## जागतिक हिवताप दिनानिमित्त प्रभातफेरी व आशांचा गौरव

**गोंदिया:** जिल्हा आरोग्य प्रशासन, जिल्हा हिवताप विभाग, केटीएस सामान्य रुग्णालयाच्या संयुक्तवतीने गुरुवारी (दि.२५) जागतिक हिवताप दिनानिमित्त जनजागृती प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले होते.

केटीएस रुग्णालयात आयोजित कार्यक्रमात दीप प्रज्वलन व रोनॉल्ड रॉस यांच्या प्रतिमेला माल्यार्पण जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अमरीश मोहबे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. विनोद चव्हाण, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. भारती जायस्वाल, जिल्हा क्षयरोग केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. वेदप्रकाश चौरागडे, जिल्हा मौखिक अधिकारी डॉ. अनिल आटे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर हिवताप जनजागृती प्रभातफेरीला मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले. प्रभातफेरीतून हिवताप आजाराबाबत जनजागृती करण्यात आली. त्यानंतर जागतिक हिवताप दिन अनुषंगाने जिल्ह्यात कीटकजन्य कार्यक्रम उत्तमपणे राबविल्याबद्दल आशा सेविकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

संचालन आरोग्य सहायक किशोर भालेराव यांनी केले. आभार नीरज अग्रवाल यांनी मानले. कार्यक्रमाला जिल्हा माध्यम विस्तार अधिकारी विजय आखाडे, जिल्हा आय.ई.सी. अधिकारी प्रशांत खरात, आरोग्य पर्यवेक्षक डोंगरे, ठाकुर, भगत, जायभाय, दीपवादे, आशिष बले, पंकज गजभिये, वर्षा भावे यांच्यासह आरोग्य विभागातील कर्मचारी व नर्सिंग कॉलेज विद्यार्थी व शहर विभागातील आशा कार्यकर्ते उपस्थित होते.

# सैन्यदलात अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुवर्णसंधी

**गोंदिया :-** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना Service Selection Board (SSB) या परीक्षेची पूर्वतयारी करुन घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे राज्यातील नवयुवक व नवयुवतींसाठी २० मे ते २९ मे २०२४ या कालावधीत SSB कोर्स क्र.५७ आयोजित करण्यात येत आहे. सदर कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थींना नि:शुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते.



तरी गोंदिया जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाच्या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, गोंदिया येथे ८ मे २०२४ रोजी मुलाखतीस उपस्थित रहावे. मुलाखतीस येतांना संबंधितांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) या वेबसाईटवर सर्च करुन त्यामधील डडइ-५७ कोर्ससाठी (अथवा जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते परिपूर्ण भरुन सोबत घेऊन यावे.

सदर एस.एस.बी. वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी कम्बाईड डिफेन्स सर्व्हीसेस एक्झामिनेशन (CDSE-UPSC) अथवा नॅशनल डिफेन्स ॲकेडमी एक्झामिनेशन (NDA-UPSC) पास झालेले असावे व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. एनसीसी उ सर्टिफिकेट अ किंवा इ ग्रेडमध्ये पास झालेले असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरने एसएसबी साठी शिफारस केलेले असावे. टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एस.एस.बी. मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. विद्यापीठ प्रवेश प्रणाली (University Entry Scheme) साठी एसएसबी कॉल लेटर असावे अथवा एस.एस.बी. साठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे.

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ई-मेल training.pctcnashik@gmail.com, दूरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२, व्हाटस्‌अॅप क्रमांक ९१५६०७३३०६ यावर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी गोंदिया यांनी केले आहे.

# अपराध नियंत्रण ब्युरोच बेपत्ता

## शिकारीमुळे वन्यप्राण्यांचा जीव टांगणीला; अंमलबजावणीकडे राज्य शासनाचेही झाले दुर्लक्ष

**गोंदिया:** केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने १४ नोव्हेंबर २०१४ मध्ये वन्यजीवांच्या शिकारी, अवैध व्यापार व अपराधांची वाढती संख्या, आंतरराष्ट्रीय शिकाऱ्यांच्या सक्रिय टोळ्या व होणारे व्यापार बघता राज्य पातळीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी पूर्णवेळ समर्पित असे वन्यजीव अपराध नियंत्रण ब्युरो स्थापन करण्याचे निर्देश दिले होते. मात्र त्याची अंमलबजावणी अद्यापही झाली नाही. परिणामी वन्यजीव धोक्यात आले आहे.

भारतीय वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अंतर्गत भारतातील सर्व वन्यजीवांना सुरक्षा प्रदान करण्यात आली आहे. मात्र वन्यजीवांच्या शिकारी, अवैध व्यापार व अपराधांची वाढती संख्या, आंतरराष्ट्रीय शिकाऱ्यांच्या सक्रिय टोळ्या व होणारे व्यापार पाहता, यावर राज्य पातळीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे ही काळाची गरज आहे. सद्यस्थितीत कार्यान्वित प्रशासकीय यंत्रणेमध्ये कमतरता असल्याने वन्यजीव अपराध नियंत्रण प्रभावीपणे करणे शक्य नाही. त्यामुळे वन्यजीवांच्या शिकारी, अवैध व्यापार व अपराधांची वाढती संख्या, आंतरराष्ट्रीय शिकाऱ्यांच्या सक्रिय टोळ्या व होणारे व्यापार पाहता राज्य पातळीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याकरिता राज्यांनी पूर्णवेळ समर्पित असणारे वन्यजीव अपराध नियंत्रण ब्युरो स्थापन करण्याचे निर्देश केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने दिले होते. ही सुचना करुन तब्बल सहा वर्षाचा काळ लोटला असताना देखील राज्यात त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. परिणामी वन्यजीव धोक्यात आले आहे. सध्या वाढते वन्यजीव अपराध नियंत्रित करण्यासाठी वन विभागाकडे वन व पोलिस यंत्रणा एकत्रित काम करणारी एकसंघ व्यवस्था नाही. तसेच वन व पोलिस विभाग या वेगवेगळ्या प्रशासकीय यंत्रणा असल्याने एकत्रित कामकाज करायला बऱ्याच मर्यादा आहेत. त्यामुळे संसाधनांची सुसज्ज व परिपूर्ण असलेली स्वतंत्र यंत्रणा स्थापन करणे अनिवार्य आहे. जिल्ह्यात अलिकडच्या काळात अनेक शिकारी झाल्या. त्यात पट्टेदार वाघ, बिबट, रानगवे, हरीण यांचा समावेश आहे. अनेक प्रकरणांत वन्यजीव आणि वनविभागाने आरोपींचा शोधदेखील लावाला. परंतु कित्येक प्रकरणात वनविभागाला आरोपींचा शोध घेण्यात अपयश आले. आधीच कामाचा व्याप अधिक असल्यामुळे या प्रकारांवर अंकुश लावण्यात विभागाला अपयश येत आहे.



### शिकारीचे प्रमाण अधिक

**गोंदियासारख्या जिल्ह्यात नैसर्गिकदृष्ट्या जैवसंपन्न आहे. जिल्ह्यात व्याघ्र प्रकल्प आणि राष्ट्रीय उद्यान आहे. त्याचप्रकारे राखीव आणि नियमित वनक्षेत्रही आहे. त्या जंगलात वाघ, बिबट व इतर वन्यजीवांच्या शिकारी व अवैध व्यापार मोठ्या प्रमाणात होत आहे. वाघ, बिबट, अस्वल, खवले मांजर, घोरपड, हरीण, काळवीट, चितळ आणि पक्ष्यांची शिकारदेखील मोठ्या प्रमाणात होत आहे. यावर आया घालणे गरजेचे आहे.**

### उन्हाळ्यात टोळ्या सक्रिय

**उन्हाळ्यात वन्यजीव पाण्याच्या आणि खाद्याच्या शोधात जंगलाबाहेर पडतात. नेमकी हिच संधी हेरत शिकार करणाऱ्या टोळ्या सक्रिय होतात. वन्यजीव जाण्या-येण्याचा मार्ग हेरुनच त्या मार्गावर करंट लावण्यात येत आणि त्यातून शिकार केली जाते.**

# वीज यंत्रणेजवळ कचरा जाळू नका; महावितरणचे नागरिकांना आवाहन




**नागपूर:-** वीज वाहिन्या, वितरण रोहीत्र, फ्फीडर पीलर किंवा वितरण पेट्यांजवळ कचरा जाळण्याच्या प्रकारामूळे वीजयंत्रणेला धोका निर्माण होऊन सर्वसामान्य नागरिकांसोबतच विज वितरण कंपनीला नाहक मन:स्ताप सहन करावा लागत असल्याने वीजयंत्रणेजवळ कचरा टाकू नये आणि त्यास जाळूही नये असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

शहरी व ग्रामीण भागात अनेक ठिकाणी वीजवाहिन्या, फ्फिडर पिलर, वितरण रोहित्र, वितरण पेटी किंवा डी.पी. अशा वीज यंत्रणेजवळील उघडयावर असलेल्या जागेत कचरा टाकण्यात येतो. वीज यंत्रणेजवळ साठवलेला हा कचरा पेटविल्याने किंवा इतर कारणामुळे कचरा जळाल्याने विजेच्या भूमिगत केबल व इतर वीजयंत्रणा आगीमुळे नादुरुस्त झाल्याच्या घटना घडल्या आहेत. पर्यायाने संबंधीत परिसरातील वीजपुरवठाही खंडित झालेला आहे. दिवसेंदिवस ऊनाचा पारा वाढत असल्याने कचऱ्यास आग लागण्याचे प्रकार वाढत आहेत.

वीज यंत्रणा उन्हामुळे तापलेली असल्याने अशातच अश्या आगीमुळे वीजवितरण यंत्रणेचे तापमान वाढल्यास यंत्रणेला त्याचा फटका बसतो. उपरी वीजवाहिन्याखाली असलेल्या कचऱ्याचा ढीग पेटल्यामुळे किंवा त्याला आग लागल्यामुळे वीजतारा वितळून वीज खंडित होण्याचा धोका अधिक आहे. नागरिकांनी उघडयावर असलेल्या वीजयंत्रणेला धोका निर्माण होईल अशा ठिकाणी कचरा टाकू नये किंवा साठवलेला कचरा जाळू नये. अशा घटनांतून वीज यंत्रणेला आग लागल्याचे आढळल्यास १९१२ किंवा १९१२०, १८००-२१२-३४३५ आणि १८००-२३३-३४३५ या टोल फ्री क्रमांकांवर किंवा नजिकच्या महावितरण कार्यालयाला त्याची सुचना देण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

## पंपाच्या ऑटो स्टार्टर मधील स्फोटाने घराला आग

**नरेंद्रनगर भागातील बोरकुटे लेआऊट येथील लक्ष्मीकांत पोच्छी यांच्या घरी बुधवारी पहाटेच्या सुमारास पंपाच्या ऑटो स्टार्टरमध्ये स्फोट झाल्याने लाकडी कार्डबोर्ड व इतर साहित्याने पेट घेतला. यामुळे संपूर्ण वायरिंग व महावितरणचे वीज मीटर जळाले. अश्या घटना टाळण्यासाठी ऑटो स्टार्टरच्या जोडणीची नियमित तपासणी करण्याचे आवाहन देखील महावितरणने केले आहे.**

### शॉर्ट सर्किटचा धोका

**घरगुती विद्युत उपकरणे आणि दिवे अति गरम झाल्याने शॉर्ट सर्कीटचा धोका होऊन आग लागण्याचीही शक्यता असते. घरगुती वायरिंग किंवा नादुरुस्त स्विचेस आणि उपकरणांमुळेही शॉर्ट सर्कीट होण्याची शक्यता आहे. इलेक्ट्रिकल आउटलेट्स किंवा एक्स्टेंशन कॉड ओव्हरलोड झाल्यास याशिवाय वायरिंगमध्ये कित्येक वेळी सैल जोड वा कनेक्शन असतात, कालांतराने हे जोड काबरेनाइज होतात. कधी कधी हे जोड सैल असल्यामुळे व त्याला घट्ट इन्सुलेशन न केल्यामुळे उंदीर, पाल आदी या वायर कुरतडतात व हळूहळू त्यामुळे स्पार्किंग सुरू होते व प्रसंगी शॉर्ट सर्कीट होऊन आग लागण्याची संभावना असते, अश्यावेळी प्रथम घरातील मेन स्विच बंद करावा व मगच पाणी न वापरता कार्बनडाय ऑक्साइड, कोरडी रेती यांच्या साहाय्याने आग विझविण्याचा प्रयत्न करावा, त्यापूर्वी याची सूचना अग्निशमन विभागाला देण्याचे आवाहनही महावितरणतर्फे करण्यात आले आहे. नॅशनल इलेक्ट्रिक कोड प्रमाणे वायरिंगचे आयुष्य २० ते २५ वर्षे असावे असे निर्देश आहेत. घरगुती वायरिंगला २० वर्षे झाल्यावर ग्राहकाने एखाद्या मान्यताप्राप्त किंवा महाराष्ट्र शासनाचा अनुज्ञप्तीधारक विद्युत कंत्राटदाराकडून आवश्यक त्या चाचण्या करून घेत त्याच्या सुचनेनुसार वयरिंग बदलून घेण्याचे आवाहनही महावितरणतर्फे करण्यात आले आहे.**

# ४७ गावांत सरपंचाचीच बसायची आहे पंचायत

**गोंदिया:** जिल्ह्यातील ५४७ पैकी ७ ग्रामपंचायतींना अद्यापही स्वत:ची इमारत नाही. तर ४० ग्रामपंचायतींच्या इमारती मरणासन्न असल्याने जिल्ह्यातील तब्बल ४७ ग्रामपंचायतीमध्ये कारभाऱ्यालाच बसायला जागा नाही. त्यामुळे गाव विकासाचा कारभार करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. गावचे हे चित्र पाहिल्यावर कसला विकास, असे म्हणण्याची वेळ गावकारभाऱ्यावर आली आहे.

पंचायत राज व्यवस्थेत स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ग्रामीण भागातील गावपातळीवर विकासाच्या दृष्टीने काम करणारी महत्वाची संस्था म्हणून ग्रामपंचायतींना विशेष महत्व आहे. गावाचा विकास आणि ग्रामस्थांना मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम ग्रामपंचायतीमार्फत केले जाते. ग्रामपंचायतींच्या बैठका, ग्रामसभा ग्रामपंचायतीकडे स्वत:च्या उपलब्ध खोलीत करता येतात. मात्र ४७ ग्रामपंचायतकडे ग्रामपंचायतचे कामकाज करण्यासाठी जागाच नाही. परिणामी त्यांना गावातील जिल्हा परिषद शाळेत कामकाज करावे लागत आहे. त्यामुळे ग्रामपंचायत कार्यालयासाठी इमारत उभारणीची अत्यंत गरज आहे.




### ४७ सरपंचांना बसण्यासाठी इमारत नाही

**जिल्ह्यातील आठ तालुक्यात ४७ ग्रामपंचायतीकडे सरपंचाला बसण्यासाठी इमारत नाही. स्वत:ची इमारत नसलेल्या ७ तर जीर्ण इमारत असलेल्या ४० अशा एकूण ४७ गावांतील सरपंचांना ग्रामपंचायतीकरिता इमारत हवी. या ४७ ग्रामपंचायतीचे कामकाज गावातील समाजमंदिर, जुन्या इमारती व शाळांच्या खोलीत सुरु असल्याचे चित्र आहे.**

### कोठे, मंदिरात तर कोठे शाळेत होतात बैठका

**ग्रामपंचायतच इमारत ४० वर्षापुर्वी बांधलेली असून ती सध्या जीर्ण अवस्थेत आहे. इमारतीत पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी गळत आहे. तरीही त्याच इमारतीमधून कामकाज सुरु आहे. मात्र ही इमारत कधी कोसळेल सांगता येत नाही. नवीन इमारत मंजुरीसाठी शासनाकडे प्रस्ताव दिला आहे.**

**कार्तिक हेमणे, सरपंच नवरगावकला**

साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार, दि.८ मे २०२४ ४

# जिल्ह्यात ३१ पैकी एकाच मिलर्सने केली धानाची उचल



**गोंदिया:-** जिल्ह्यात राईस मिलर्सच्या असहकार धोरणामुळे शासकीय धान भरडाई वांद्यात आहे. धान भरडाईसाठी ३१ मिलर्सनी करारनामे केले असले तरी केवळ एकाच मिलर्सने धानाची उचल केली असल्याची माहिती आहे.

आजस्थितीत जिल्ह्यातील गोदामांत व उघड्यावर ३२ लाख क्विंटल धान पडून आहे. वेळेत धानाची भरडाई न झाल्यास उन्ह-ाळी हंगामातील शासकीय धान खरेदी अडचणीत येणार, हे मात्र निश्चित!

गोंदिया जिल्ह्यात शासनाच्या हमी भाव योजनेअंतर्गत धान खरेदी केले जाते. यंदाच्या खरीप हंगामात जिल्हा पणन कार्यालयाच्या उपअभिकर्ता संस्थांनी २४.७८ लाख क्विंटल तर आदिवासी विकास मंडळाच्या उपअभिकर्ता संस्थांनी ७.२० लाख क्विंटल धान खरेदी केले. धानाच्या भरडाईसाठी दरवर्षी राईस मिलर्स करारनामा करतात. मिलर्स धान भरडाई करून ६७ टक्केच्या प्रमाणात तांदूळ शासन जमा करतात.

भरडाईसाठी केंद्र सरकारकडून आजही प्रति क्विंटल १० रुपये दिले जातात. मध्यप्रदेश, छतीसगड राज्यात तेथील सरकारे अनुक्रमे २०० व १२० रुपये प्रति क्विंटल भरडाईसाठी देतात. आज वीज, इंधन, हमाली व इतर बाबींच्या किमतीत प्रचंड वाढ झाली असताना केंद्र सरकार तटपुंजे भरडाई दर देऊन मिलर्सची चेष्टा करीत असल्याचा आरोप होत आहे. मागील वर्षी जिल्हा व जिल्ह्याबाहेरील ३४७ मिलर्सनी धान भरडाईसाठी करार केला होता.

यंदा केवळ ३१ मिलर्सनीच करार केला आहे. पैकी केवळ एकाच मिलर्सने ४०२० क्विंटल धानाची भरडाईसाठी उचल केली आहे. वेळेत धानाची भरडाई न झाल्यास धानाचे प्रचंड नुकसान तर होणारच शेतकऱ्यांनाही केंद्रावर धान विक्री करता येणार नाही. आजही आदिवासी महामंडळाचा लाखो क्विंटल धान उघड्यावर पडून असल्याने अवकाळी पावस-ाने प्रचंड नुकसान झाले आहे. नुकसान झाल्यानंतर मिलर्सच्या म ागण्यांवर तोडगा काढल्यास त्याचा काय फ़ायदा. यात शासनाचेच कोट्यवधीचे नुकसान होणार. गोदामांत धान पडून असल्याने उन्हाळी धान खरेदी करता येणार नाही. परिणामी शेतकऱ्यांना खुल्या बाजारात अल्प किमतीत व्यापाऱ्यांना धान विक्री करण्याची नामुष्की ओढावेल. करीता शास-नाने मिलर्सच्या मागण्यांवर विना विलंब तोडगा काढणे आवश्यक आहे.

### दर वाढविण्याकरीता राईसमिलर्सलाच असहकार

**महाराष्ट्र शासनाने प्रती क्विंटल १० रुपये प्रमाणे धान भरडाई दर ठरविले आहे. परंतु राईस मिर्लसनी हे दर वाढवून मागितले असून धान भरडाई करणाऱ्या मिलर्संना धान हमाली, मिलींग व तांदूळ हमाली वरील काम करणाऱ्या मिलर्स मालकांना प्रोत्साहन देण्याचे आश्वासन मागिल ३-४ वर्षापासून आमदार, खासदार देत आहेत. परंतु मिलर्स मालकांचे लोकप्रतिनिंधींच्या सततच्या आश्वासनाने निराशा झाली असून धान भरडाईत सतत झालेले नुकसान पाहून यावर्षी धान मिलींग करणाऱ्या संस्थांनी वरील गोष्टीचा विरोध करीत भरडाई न करता शासनाला असहकाहाची भूमिका घेतली आहे.**

# रेल्वे उड्डाण पुलाच्या बांधकामाला मुहूर्त सापडेना

## आमदार विनोद अग्रवाल यांनी अधिकाऱ्यांना खडसावले, अन्यथा करणार आंदोलन

**गोंदिया:-** गोंदिया येथील रेल्वे उडान पुलाचे बांधकाम म्हणजे गोंदिया वासियांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. आमदार विनोद अग्रवाल व खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या प्रयत्नाने या उडान पुलाची मंजुरी प्रदान करण्यात आली होती. आमदार विनोद अग्रवाल व माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या हस्ते या पुलाचे भूमिपूजन करून तत्काळ कामाला सुरुवात करण्याचे आदेश सुद्धा संबंधित विभागाला देण्यात आले होते. तरीही कंत्राटदार व संबंधित विभागाकडून काम सुरु करण्यासाठी मुहूर्त सापडत नसल्याने नागरिकांनी परत आम दार विनोद अग्रवाल यांच्या कडे धाव घेतली.

याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग व कंत्राटदार यांची संयुक्त बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत आमदार विन-ोद अग्रवाल यांनी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांना चांगलेच खडसावले. एवढे परिश्रम आणि विविध परवानग्या मिळवून कामाला मंजुरी मिळवून देण्यात आली तरीही अद्याप काम सुरु न झाल्याने नागरिकांना होणाऱ्या त्रासाची जाणीव अधिका?यांना नाही असेही यावेळी आमदार विनोद अग्रवाल यांनी सुनावले.

काही दिवसात परत पावसाळा सुरु झाला म्हणून काम बंद केले जाईल यापेक्षा किमान काम सुरु झाले असते तर अद्याप दोनही बाजूने पुलाचे बांधकाम झाले असते. परंतु असे न करता काम सुरु सुद्धा झाले नाही. यामुळे आमदार विनोद अग्रवाल संतापले होते.



### अन्यथा करणार आंदोलन !

**कामात जी दिरंगाई झाली ती झाली परंतु जर या कामाला ८ दिवसाच्या आत सुरुवात झाली नाही तर आंदोलनाची भूमिका घेतली जाईल. साखळी उपोषणाच्या माध्यमाने सुरुवात करून मागणी पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा आमदार विनोद अग्रवाल यांनी केले असून आम्हाला रस्त्यावर उतरण्याची गरज पडू देवू नका असेही यावेळी ते बोलले.**

# साठवण बंधारा बांधकामासाठी मातीमिश्रित रेतीचा उपयोग

## टेकाटोला दंडारी येथील प्रकार, गावकऱ्यांनी केली तक्रार

**सालेकसा:** तालुक्यातील टेकाटोला दंडारी येथे साठवण बंधारा तयार केला जात आहे. बंधारा बांधकामासाठी दर्जेदार बांधकाम साहित्याचा वापर करण्याची गरज आहे. परंतु आदिवासी भागात तयार होत असलेल्या साठवण बंधाऱ्यासाठी वापरण्यात येणारी रेती मातीमिश्रीत आहे. मातीमिश्रीत रेती परिसरातील जंगलातील नाल्यातून आणून वापरली जात आहे. त्यामुळे या बांधकामावर गावकऱ्यांनी आक्षेप घेत याची तक्रार केली आहे.

दरेकसापासून १२ किमी अंतरावर असलेल्या दंडारी टेकाटोला येथील नाल्यावर साठवण बंधारा बांधला जात आहे. औरंगाबाद महामंडळातर्फे सुमारे ७० ते ८० लाख रुपयांचा निधीतून या बंधाऱ्याचे बांधकाम केले जात आहे. परंतु कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने अत्यंत निकृष्ट दर्जाचे बांधकाम साहित्य वापरले जात असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. ही बाब लक्षात घेता ग्रामपंचायत सदस्यांसह जागरुक ग्रामस्थांनी बंधाऱ्याचे निर्माण होत असलेल्या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता, कंत्राटदाराकडून मातीमिश्रीत रेतीचा वापर केला जात असल्याचे उघडकीस आले.

यासंदर्भात गावकऱ्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार केली. परंतु अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही. दंडारीसारख्या मागास भागात कोणतीही शासकीय योजना राबविली जात असताना संबंधित विभागाकडून त्यावर देखरेख केली जात नाही. तर कंत्राटदार व अधिकाऱ्यांच्या संगनमताने निकृष्ट काम केले जात असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे अलपावधीत या बंधाऱ्याची दुरवस्था होते. हे काम दर्जेदार व्हावे, अशी मागणी येथील गावकऱ्यांनी केली आहे.



**साठवण बंधाऱ्याचे बांधकाम करत असलेल्या ठिकाणी भेट दिली असता खाली निकृष्ट दर्जाची मातीमिश्रीत रेती टाकली असून सिमेंटसुद्धा योग्य प्रमाणात वापरण्यात आलेले नाही. त्यामुळे बंधारा केव्हाही फुटू शकतो. अधिकाऱ्यांनी याची चौकशी करुन कंत्राटदारावर कारवाई करावी.**

**मुकेश इनवाते, ग्रामपंचायत सदस्य, मुरकुटडोह-दंडारी**

# "आरटीई"च्या जागा १४ हजार अन अर्ज अवघे ४७७

**गोंदिया :** शालेय शिक्षण विभागाने यंदा शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) प्रवेश प्रक्रियेत केलेल्या बदलांमुळे पालकांनी प्रवेश प्रक्रियेकडे पाठ फिरवली आहे. जिल्ह्यात १ हजार २२५ शाळांमध्ये प्रवेशासाठी १४ हजार ३३९ जागा आहेत. केवळ ४७७ विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झाले. गोंदियातूनच नव्हे तर संपूर्ण राज्यात आरटीई प्रती पालकांची उदासिनता पाहता शिक्षण विभागाने अर्ज नोंदणीसाठी १० मेपर्यंत मुदतवाढ दिली आहे. तरीही यंदा आरटीई प्रवेशाच्या जागा रिक्त राहण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

आरटीई प्रवेशांसाठी अर्ज नोंदणी प्रक्रिया १६ एप्रिल-पासून सुरू करण्यात झाली. अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३० एप्रिल होती. मात्र आरटीई प्रवेश प्रक्रियेतून खासगी विनाअनुदानित शाळा, विशेषत: इंग्रजी शाळा वगळण्यात आल्याने पालकांनी प्रवेश प्रक्रियेकडे पाठ फ़िरवली आहे.

या पार्श्वभूमीवर १० मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तब्बल दोन महिन्याच्या विलंबानंतर सुरू झालेली आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरूवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात सापडली. पाल्याच्या प्रवेश निश्चितीसाठी पालकांना एक किलोमीटर परिघातील शासकीय व अनुदानित शाळांनाच प्राधान्य द्यावे लागत आहे. अर्ज प्रक्रियेतही नामांकित शाळा निवडता येत नसल्याने नोंदणीत पालकांचा निरूत्साह दिसून येत आहे.

मागील शैक्षणिक वर्षापर्यंत पालकांकडून आरटीई ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभत होता. उपलब्ध जागांच्या तुलनेत प्राप्त अर्जांची संख्या अधिक असल्याने प्रत्यक्ष प्रवेश देताना कसोटी लागत होती. त्यासाठी लॉटरी पद्धतीने विद्यार्थ्यांची निवड केली जात होती. मात्र यंदा अर्ज नोंदणीला अल्प प्रतिसाद आहे. उपलब्ध जागांच्या तुलनेत फार कमी अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यामुळे लॉटरी पद्धत बंद होण्याची शक्यता आहे.




## बयाणे, खते व किटकनाशके नियंत्रण कक्ष स्थापन

**गोंदिया:** जिल्हयात खरीप हंगामात गुणवत्तापूर्ण बियाणे, खते व किटकनाशकाचा पुरवठा व निविष्ठांचा काळाबाजारावर प्रतिबंधासाठी तसेच शेतक-यांचे फसवणुक होत असल्याचे निदर्शनास आल्यास शेतक-यांनी कंट्रोला रुम (नियंत्रण कक्ष) मध्ये तक्रार दाखल करावी आडे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, हिंदुराव चव्हाण यांनी केले आहे.शेतक-यांना येणा-या अडचणीबाबत त्यांच्या समस्यांचे निराकरण नियंत्रण कक्षात करण्यात येणार आहे. बियाणे, खते व किटकनाशकांची खरेदी करतेवेळेस शेतक-यांना विविध अडचणी येतात. या अडचणी सोडविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या निर्देशांनुसार जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. नियंत्रण कक्षात शेतक-यांना येणा-या अडचणी व निविष्ठांची गुणवत्ता, किंमत, साठेबाजी व लिकींगबाबत असलेल्या प्रत्येक तक्रारीचे निवारण करण्यात येणार आहे. जादा दराने खताची विक्री होत असल्यास बियाणे, खते खरेदीचे बिल मिळत नसल्यास शेतक-यांनी आपल्या नावासह व संपूर्ण पत्ता, तक्रारीचे स्वरुपयांची माहिती देऊन निवारण कक्षात तक्रार नोंदवावी, असे त्यांनी सांगितले.

## बापरे!सीएस कार्यालय म्हणते तो नपुंसक

**गोंदिया:** तू नपुंसक अहे, असे म्हटल्यास तळपायाची आग मस्तकात जाते. मात्र असाच खोटा प्रकार गोंदियातील जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयात झाल्याचे समोर आले. नागपुरातील अंबाझरी येथील एका जोडप्याला गोंदिया जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाच्या तपासणीअंती चक्क नपुंसकत्व प्रमाणपत्र दिल्याने त्यांना धक्का बसला. त्या जोडप्याने नागपूर येथे अवघ्या ७ दिवसांत तपासणी केली असता ते जोडपे प्रजननक्षम असल्याचे समोर आले. त्यामुळे जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयात नेमके चालले तरी काय? असा सवाल उपस्थित होत आहे.

नागपूर शहरातील एका जोडप्याने गोंदियातील केटीएस रुग्णालयात प्रजनन क्षमता तपासणी केली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबरिश मोहबे यांनी २० डिसेंबरला कोणतीही तपासणी न करता त्या जोडप्याला वंध्यत्व प्रमाणपत्र दिले. अशा परिस्थितीत पती-पत्नी दो-घेही मानसिकदृष्ट्या मोडकळीस आले. बराच त्रास झाल्यावर त्यांनी पुन्हा नागपुरातच तपासणी करण्याचे ठरवले. ते नागपुरच्या जिल्हा शल्यचिकित्सांकडे गेले. २६ डिसेंबर २०२३ रोजी या जोडप्याची शारीरिक तपासणी झाली. या तपासणीत या जोडप्याला प्रजनन क्षमतेचे प्रमाणपत्र देण्यात आले. या प्रकरणाच्या तक्रारी जिल्हा दंडाधिकारी वगळता इतरत्रही करण्यात आल्या आहेत. गोंदिया जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाने चुकीचे प्रमाणपत्र दिल्याने त्या दाम्पत्याचे मनोबल खचले होते.




अखेर सहा दिवसांनी हिंमत एकवटून त्यांनी नागपुरातील सर्वोपचार रुग्णालय गाठले. नागपुर सीएसकडे झालेल्या तपासणीत त्या महिलेला प्रजनन प्रमाणपत्र देण्यात आले. याप्रकरणी महाराष्ट्र उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायाधीश, महाराष्ट्र शासनाचे लोकायुक्त, मुख्यमंत्री, राज्याचे आरोग्यमंत्री आणि गोंदियाचे जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडेही तक्रार करण्यात आली असून चौकशीची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हा शल्यचिकित्सक मात्र आपल्याला बदनाम करण्यासाठी हा खटाटोप सुरु असल्याचे सांगितले.

# जिल्ह्यातील १८ पोलिसांना पोलिस महासंचालकांचे सम्मान पदक

## ४ अधिकाऱ्यांसह १४ पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश



साहिल झरकर सोमनाथ कदम

### जिल्ह्यासाठी गौरवाची बाब


**गोंदिया जिल्हा पोलिस दलातील एकूण १८ उत्तम कामगिरी करणाऱ्या पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या उल्लेखनीय, प्रशंसनीय सेवेबद्दल महासंचालकांचे सम्मान पदक जाहीर झाले आहे. प्रथमच जिल्ह्यातील १८ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सम्मान होत असून ही जिल्हावासीयांसाठी आणि गोंदिया पोलिस दलासाठी निश्चितच गौरवाची बाब आहे.**

**निखील पिंगळे, जिल्हा पोलिस अधीक्षक**

**गोंदिया:** जिल्हा पोलीस आस्थापनेवरील उत्तम कामगिरी करणारे आणि उल्लेखनीय, प्रशंसनीय सेवेबद्दल पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्यांना पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी २५ एप्रिल रोजी काढलेल्या आदेशात सन-२०२३ साठी सम्मानचिन्ह जाहीर केले आहे. यासाठी जिल्ह्यातील एकूण १८ पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची निवड झाली आहे. ही जिल्हावासीयांसाठी कौतुकाची बाब आहे.

पदक प्राप्त अधिकाऱ्यांमध्ये तिरोडा येथील उपविभागीय पोलिस अधिकारी साहिल झरकर, शहर ठाण्यात कार्यरत सहायक पोलिस निरीक्षक सोमदास कदम, पोलिस उपनिरीक्षक रोशन वासुदेव खांडेकर तर कर्मचाऱ्यांमध्ये सहायक फौजदार जितेंद्र राजनारायण मिश्रा, पोलिस हवालदार उमेश रामकृष्ण मलखांबे, प्रेमदास बालाजी होळी, ज्योती मोहनदास मरकाम, विनोद रामचंद्र कुंभरे, पुनम जीवनलाल हरिणखेडे, शैलेश सोमाजी राऊत, उमेश भगवान मंडारे, कैलाश हिवलाल शहारे, विकास भुजंगराव माने, निकलेश रमेश वासनिक, धीरज राजेंद्रप्रसाद दुबे, लीलाधर मोरेश्वर चुटे, महेश सोमाजी वलथरे, राहुल चरणदास सावरकर यांचा समावेश आहे. पोलिस महासंचालकांचे पदक जाहीर झालेल्या सर्व पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्यांचे पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलिस अधीक्षक नित्यानंद झा यांनी कौतुक केले आहे.

# व्यापक जनजागृती तरी सन २०१९ च्या तुलनेत २०२४ मध्ये घटला मतदानाचा टक्का




**गोंदिया:** निवडणूक विभागाने भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघाची मतदानाची अंतिम टक्केवारी जाहीर केली आहे. यात २० एप्रिल रोजी जाहीर केलेल्या टक्केवारीच्या तुलनेत थोडा फरक पडला आहे. विशेष म्हणजे सन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भंडारा विधानभा वगळता उर्वरित पाचही मतदारसंघात मतदानात घट झाली आहे.

विशेष म्हणजे प्रशासनाने या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी ७५ टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी विविध जनजागृतीपर उपक्रम राबविले. पण यानंतरही मतदानाचा टक्का घसरला आहे. मतदानाचा टक्का का घसरला हा सध्या मंथनाचा विषय झाला आहे. लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी प्रशासनाने दोन महिन्यांपासून नियोजन केले होते. या निवडणुकीत प्रथमच मतदानाच्या दहा दिवसांपुर्वी मतदार चिठ्ठ्यांचे सर्व मतदारांना वाटप केल्याचा दावा प्रशासनाने केला होता. मात्र प्रत्यक्षात कित्येक मतदारांना मतदार चिठ्ठी मिळाली नाही. अनेकांची नावे मतदार यादीत नसल्याने त्यांना मतदान केंद्रावरुन परतावे लागले होते. शिवाय तापमानाचासुद्धा काही प्रमाणात मतद-ानावर परिणाम झाल. मतदानाप्रती यावेळी मतदारांमध्ये उत्साहाचा अभाव दिसून आला. या सर्व गोष्टीमुळे मतद-ानाचा टक्का घसरल्याचे बोलले जाते. पण घटलेले मतदान कुणाच्या पथ्यावर हा सध्या मतदारसंघात चर्चेचा विषय ठरला आहे.

# दर दोन वर्षांनी बंधाऱ्यांची दुरुस्ती, पण सिंचन होईना

## म्सहवानी येथील प्रकार: संबंधित विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह



**सडक अर्जुनी:** तालुक्यातील म्हसवानी येथे सन २०१४-१५ मध्ये बांधलेल्या बंधाऱ्यावर दर दोन वर्षानंतर दुरुस्तीच्या ना-वावर पैशांची उधळपट्टी केली जात आहे. पण बंधाऱ्याची दुरुस्ती करुनसुद्धा बंधाऱ्यात पाणी साचून राहत नाही. कित्येकदा बंधाऱ्याची साइड वॉल (भिंत) पाण्याने वाहून जाते. असाच प्रकार संपूर्ण सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव या दोन्ही तालुक्यांत बांधलेल्या बंधाऱ्यांवर दिसत आहे.

मृद व जलसंधारण विभागांतर्गत बांधलेले बंधारे पावसाळ्यात पहिल्याच पावस-ाने वाहून जातात. जलसंधारण विभागाचे मुख्य अधिकारी व उपविभागीय अधिकारी, शाखा अभियंता यांचे बंधाऱ्यांच्या बांधकामाकडे दुर्लक्ष झाल्याने कंत्राटदार आपल्या मनमर्जीने बांधकाम करीत आहेत. बंधारा बांधकामासाठी निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर केला जात असल्याने अल्पावधीतच बंधाऱ्याची दुरवस्था होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांचा आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.

नियमबाह्य व नियोजनशून्य निकृष्ट बांधकामाची चौकशी न झाल्यास जनहित याचिका दाखल करण्याची तयारी आता शेतकऱ्यांनी केली आहे. सन २०२३-२४ मध्ये मृद व जलसंधारण विभाग गोंदिया अंतर्गत सडक अर्जुनी तालुक्यातील म्ह-सवानी येथील साठवण बंधारा दुरुस्तीसाठी १ कोटी २० लाख रुपये मंजूर केले आहेत. गेल्या महिनाभरापासून तालुक्यातील डव्वा येथील कंत्राटदार हे काम करीत आहेत.

### योजनेच्या उद्देशाला हरताळ

**शासनाने एकीकडे मृद व जलसंधारण विभागाअंतर्गत नाले, ओढे यांच्या माध्यमातून वाहत जाणारे पाणी अडवून भूजल पातळी वाढविणे तसेच नाल्याजवळील शेतीला पाणी पुरवठा करण्याचे धोरण अवलंबिले आहे. तसेच वन्यप्राण्यांनासुद्धा पिण्याच्या पाण्याची सोय होईल हा या योजनेचा मुख्य हेतू होता. मात्र या विभागाच्या दुर्लक्षित धोरणामुळे या बंधाऱ्यांचा कसलाच उपयोग होत नसल्याने योजनेला हरताळ फासला जात असल्याचे चित्र आहे,**

**संबंधित विभागाच्या नियोजनाअभावी बंधाऱ्याचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम केले जात आहे. शासनाने ज्या कामासाठी कोट्यावधी रुपये खर्च केले ते सर्व व्यर्थ ठरत आहे. गेल्या दहा वर्षांपासून असाच प्रकार सुरु आहे. स्थानिक ग्रामपंचायतीच्या हद्दीत सुरु असलेल्या बांधकामाची माहिती ग्रामपंचायत व पदाधिकाऱ्यांनासुद्धा संबंधित विभागाकडून दिली जात नाही. त्यामुळे या प्रकाराची चौकशी करण्याची गरज आहे.**

**प्रकाश रहांगडाले, सरपंच म्हसवानी**

# पैसे न दिल्याने शवविच्छेदनास विलंब,कुटुंबियांचा आरोप

**गोंदिया:** तेंदुपत्ता काढण्यासाठी गेलेल्या महिलेवर जंगली कुंत्र्यांनी हल्ला केला. या घटनेत महिलेचा मृत्यू झाला. शासकीय महाविद्यालयातील शवागारगृहातील मृतदेहाचे विच्छेदन करण्यासाठी रक्कम न दिल्यामुळे विच्छेदन करण्यास विलंब करण्यात आला. असा आरोप मृत महिलेच्या कुटुबियांनी केला आहे.

विशेष म्हणजे आमगाव तालुक्यातील नांगटोला (जामखरी) येथील देवांगण भारत बिसेन (६०) ही महिला बुधव-ारी दुपारी ४ वाजता तेंदुपत्ता काढण्यासाठी जंगलात गेली होती. यावेळी ८ ते १० जंगली कुत्र्यांनी महिलेवर हल्ला केला. ज्यामध्ये महिला गंभीर जखमी झाली. सायंकाळी ७ वाजता महिलेला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान रात्री ११.३० वाजता त्यांचा मृत्यू झाला. सकाळी महिलेच्या मृतदेहाचे विच्छेदन करणे आवश्यक होते. मात्र दुपारपर्यंत देखील शवविच्छेदन झाले नव्हते. मृतदेहाचे विच्छेदन करण्यासाठी पाणी, धागा, सुतळी, कपडे इत्यादी खरेदीसाठी कर्मचाऱ्याने एक हजार रुपयांची मागणी केली होती. ही रक्कम दिली नसल्याने शवविच्छेदन करण्यात आले नसल्याचा आरोप मृत महिलेचा पुतण्या सोनू बिसेन याने केला आहे.




**शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कोणत्याही प्रकारच्या उपचारासाठी रक्कम मागितली जात नाही. कोणत्याही विभागासाठी किंवा विच्छेदनासाठी रक्कम विचारणे ही गंभीर बाब आहे. डॉक्टर, कर्मचारी किंवा अधिकारी पैसे मागत असेल तर तक्रार करा. तत्काळ कारवाई केली जाईल.**

**कुसुमाकर घोरपडे, डीन, जीएमसी**